दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार
www. sahyandrinews.com
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •
• (महाराष्ट्र) वर्ष ०२ • ९६ • RNI : MAHMAR/2023/87818 • सोमवार दि.३ फेब्रुवारी २०२५ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

Agro. Tourism & Adventure Park
कृषी पर्यटन व ॲडवेंचर पार्क
कोळोना (घोडेगाव), पुलगाव जवळ, ता. देवळी जि. वर्धा

## जर का पैसे घेत असतील,तर तुमची खैर नाही

# विहीरीमागे ७५ हजारांची मागणी करणाऱ्या भावकीला अजित पवारांचा सज्जड दम

**बारामती (वृत्तसंस्था)**–राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार आपल्या परखड आणि स्पष्ट स्वभावासाठी ओळखले जातात. त्यांच्या या स्वभावाचा अनुभव बारामतीकरांनी अनेकदा घेतला आहे. आज देखील बारामतीकरांनी हा अनुभव घेतला. तालुक्यातील नागरिकांच्या विहिरींच्या मंजुरीसाठी ७५ हजार रुपये घेतले जात असल्याची तक्रार अजित पवारांकडे काहींनी केली होती. सुजय पवार यांच्याकडून पैसे मागितले जात असल्याचे त्यांना सांगण्यात आले. ते पैसे घेत असतील तर त्यांचे काही खरें नाही, असा सज्जड इशारा उपमुख्यमंत्री पवार यांनी भर सभेत स्टेजवरुन दिला.उपमुख्यमंत्री अजित पवार आज बारामती दौऱ्यावर होते. बारामतीतील पंचायत समितीच्या जवळच्या इमारतीतील एका बँक शाखेच्या उद्घाटन त्यांच्या उपस्थितीत झाले. याप्रसंगी भाषणात बोलताना अजित पवार यांनी आपल्या भावकीला उपरोक्त इशारा दिला. शिवाय बारामतीमध्ये होणाऱ्या विविध विकासकामांसंबंधी त्यांनी माहिती दिली. बर्हाणपुर येथे एकाने मला निवेदन दिले की, सुजय पवार कोण आहे का? पंचायत समितीकडून शेतकऱ्यांना मोफत विहीर देण्याची योजना आहे. मात्र या कामात आमची एक भावकीच पैसे मागत असल्याची तक्रार माझ्याकडे आली आहे. एका विहिरीमागे ७५ हजार रुपयांची मागणी होत आहे.याबाबत 'बीडीओं'नी नोंद घेण्याची सुचना यावेळी पवार यांनी केली. ते पुढे म्हणाले की, मी एकच बाजू बघत नाही. याबाबत शहानिशा करावी लागेल. जर का पैसे घेत असतील तर त्याचे काय खरे नाही, अशा शब्दांत पवार यांनी कारवाईचा इशारा दिला. तसेच घेत नसतील तर चांगल्या कामासाठी शुभेच्छा आहेत, असे अजित पवार म्हणाले.अजित पवार यांनी यावेळी पुणे जिल्ह्यातील दुसऱ्या विमानतळाबाबतही माहिती दिली. पुरंदरचे विमानतळ जिथे नागरी उड्डाण खात्याने ठरवले आहे तिथेच होईल, काही लोकांची नाराजी घ्यावी लागली तरीही ते तिथेच होईल, असे ते म्हणाले.बँकेच्या उद्घाटनानंतर बँक अधिकाऱ्यांची ओळख करुन घेताना पवार यांना संबंधित बँक मॅनेजरने पानसदृश्य काहीतरी खाल्ल्याचे लक्षात आले. यावरून त्यांनी बँक मॅनेजरची फिरकी घेतली. आप पान खाते है क्या? असा सवाल पवारांनी मॅनेजरला केला. अधिकाऱ्याने नकार दर्शविताच 'आप मुझे बेवकुफ समजते हो क्या? असे म्हणत व्यसनाने कॅन्सर होतो, असे मॅनेजरला सांगितले.




## पहिल्या नियोजन समितीच्या बैठकीत संगमनेर आणि महावितरणच्या कामकाजावर चर्चा

**अहिल्यानगर । शहाजी दिघे**

अहिल्यानगरमध्ये शनिवारी पार पडलेल्या नियोजन समितीच्या बैठकीत संगमनेर तालुक्यातील विविध समस्यांवर आणि महावितरणच्या कार्यपद्धतीवर तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या उपस्थितीत झालेल्या या बैठकीत जिल्ह्यातील अनेक महत्वपूर्ण विषयांवर चर्चा झाली. बैठकीला नाशिक शिक्षक मतदारसंघाचे आमदार सत्यजित तांबे, आमदार अमोल खताळ, आमदार काशिनाथ दाते, आमदार विठ्ठलराव लंघे, आमदार हेमंत ओगले आणि इतर मान्यवर उपस्थित होते.



बैठकीची सुरुवात शासकीय कार्यालयांमधील स्वच्छतागृहांच्या दुरवस्थेच्या मुद्द्यावरून झाली. आमदार सत्यजित तांबे यांनी जिल्हाधिकारी कार्यालय आणि तालुका पातळीवरील शासकीय कार्यालयांमधील अस्वच्छता आणि हलाखीच्या परिस्थितीवर प्रश्न उपस्थित केला. त्यांनी विशेषतः जिल्हाधिकारी कार्यालयातील स्वच्छतागृहांची दुरवस्था अधोरेखित केली आणि यावर तातडीने उपाययोजना करण्याची आवश्यकता व्यक्त केली.

आमदार तांबे आणि खताळ यांनी मानवी वस्तीत बिबट्यांचा वाढता शिरकाव एक मोठा प्रश्न ठरला आहे असे सांगितले. त्यांच्या हल्ल्यांमुळे ग्रामीण भागात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे बिबट्यांची नसबंदी करण्याची मागणी केली.

आमदार तांबे आणि खताळ यांनी संगमनेर तालुक्यात जलसंधारणाच्या मंजूर प्रकल्पांची अंमलबजावणी लांबणीवर पडली आहे, याबद्दल नाराजी व्यक्त केली. प्रशासनाच्या ढिसाळ कारभारामुळे या प्रकल्पांची अंमलबजावणी होऊ शकलेली नाही.

महावितरणच्या कार्यपद्धतीवर नाराजी व्यक्त करत आमदार काशिनाथ दाते यांनी शेतकऱ्यांना वीज जोडणी मिळण्यात येणाऱ्या अडचणींबद्दल चिंता व्यक्त केली. शेतकऱ्यांना पुरेशा वीज पुरवठ्याचा अभाव असून, नवीन वीज जोडणीसाठी सोलर पंपाचा पर्याय सुचवला जात आहे, पण सोलर पंप प्रत्येक शेतकऱ्यासाठी शक्य नसल्यामुळे महावितरणने अधिक लवचिक धोरण स्वीकारण्याची आवश्यकता आहे. महावितरणच्या धोरणामुळे संगमनेर तालुक्यात शेतकऱ्यांना 'डार्क झोन' अटीमुळे वीज पुरवठा थांबवला जात आहे, यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होईल. या धोरणामुळे शेतकऱ्यांना अडचणींना सामोरे जावे लागते, असे आमदार दाते आणि इतर आमदारांनी पालकमंत्री विखे पाटील यांच्याकडे दिलेल्या निवेदनात सांगितले.

बैठकीत कालव्याच्या दुरुस्ती, वीज खंडित होण्याच्या समस्या, रेल्वे हद्दीतील अतिक्रमण, सोलर वीज पंप योजना, नगरपालिका क्षेत्रात छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा उभारण्याची मागणी, तसेच अंमली पदार्थांच्या विक्रीवर प्रतिबंध घालण्याच्या उपाययोजनांवर चर्चा करण्यात आली .नियोजन समितीच्या या बैठकीत सर्वसामान्यांच्या समस्यांवर तातडीने तोडगा काढण्यासाठी आमदारांनी आक्रमक भूमिका घेतली. शेतकऱ्यांच्या वीजपुरवठ्याच्या समस्या, महावितरणची कार्यशैली, संगमनेर तालुक्यातील जलसंधारण प्रकल्प आणि बिबट्यांच्या हल्ल्यांवर नियंत्रण ठेवण्याचे महत्त्वपूर्ण मुद्दे चर्चेचा मुख्य केंद्रबिंदू होते. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी या सर्व मुद्द्यांवर गांभीर्याने विचार करून लवकरच सकारात्मक निर्णय घेण्याचे आश्वासन दिले.

बैठकीत शेतकऱ्यांच्या समस्या प्रामुख्याने चर्चेत आल्या. वीजपुरवठ्याचा अभाव, विजेच्या जोडणीसाठी उदासीनता आणि जलसंधारणाच्या प्रलंबित कामांमुळे शेतकरी त्रस्त आहे. सरकारने तातडीने या समस्यांसाठी ठोस निर्णय घेणे आवश्यक असल्याचे सर्व आमदारांनी बैठकीत ठासून सांगितले.

## वर्ध्यात ८० लाखांचा गुटखा आणि तंबाखू नष्ट

**वर्धा । प्रतिनिधी**

अन्न व औषध प्रशासनाने जिल्ह्यात विविध ठिकाणी केलेल्या कारवाईत जप्त करण्यात आलेल्या सुमारे ८० लाख रुपये किंमतीच्या ८ टन प्रतिबंधित गुटखा आणि तंबाखूचा शुक्रवार, ३१ जानेवारी रोजी वर्धा नगरपालिकेच्या कचरा डेपो परिसरात शासकीय नियमानुसार नाश करण्यात आला.सुगंधी तंबाखू व गुटखा विक्री तसेच साठवणुकीवर शासनाने बंदी घातली आहे. मात्र जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर त्याचा व्यापार सुरू असल्याचे आढळून आले. अन्न व औषध प्रशासनाच्या अन्न विभागाने वेळोवेळी केलेल्या धडक कारवायांत या प्रतिबंधित पदार्थांची मोठ्या प्रमाणावर जप्ती करण्यात आली होती.

इंझाळा येथील कचरा डेपोत शासकीय नियमांनुसार या जप्त सामग्रीचा नाश करण्यात आला. नष्ट करण्यात आलेल्या गुटखा व तंबाखूची किंमत ८० लाख रुपये असल्याचे सांगण्यात आले.कारवाईदरम्यान प्रफुल्ल टोपले, अन्न निरीक्षक राजेश यादव, संदीप नंदुरकर, रमन बावणे, अमित तुपखाने, सौरभ चव्हाळे व निखारे आदी अधिकारी उपस्थित होते.



## अवैध दारू प्रकरणात अटक टाळण्यासाठी लाच
## सिंदी रेल्वेतील झडख एसीबीच्या जाळ्यात






**वर्धा । प्रतिनिधी**

अवैध दारू प्रकरणात अटक टाळण्यासाठी २,५०० रुपयांची लाच मागणाऱ्या सिंदी रेल्वे पोलिस ठाण्याचे उपनिरीक्षक मनोहर रामदास चांदेकर (वय ५७) यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (ACB) रंगेहात पकडले. ही कारवाई शनिवारी, १ फेब्रुवारी रोजी करण्यात आली.

१६ नोव्हेंबर रोजी तक्रारदाराच्या (एमएच-४९/एम-७२४२) वाहनाचा वापर अवैध दारू वाहतुकीसाठी झाल्याने त्याच्यावर सिंदी रेल्वे पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणात अटक न करण्यासाठी झडख चांदेकर यांनी तक्रारदाराकडे २७ जानेवारी रोजी २,५०० रुपयांची मागणी केली.

तक्रारदाराने या मागणीबाबत ACB कडे तक्रार केली. या माहितीनुसार एसीबीने सापळा रचला आणि शनिवारी पंचासमक्ष चांदेकर यांनी लाच स्वीकारल्यानंतर त्यांना ताब्यात घेतले. या प्रकरणी सिंदी रेल्वे पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.ही कारवाई पोलिस उपअधीक्षक वैशाली वैरागडे यांच्या नेतृत्वाखाली पोलिस निरीक्षक अरविंद राऊत, संदीप मुपडे, मंगेश गंधे, प्रशांत वैद्य, पंकज डहाके, पंकज टाकोणे, गणेश पवार, चालक मेश्राम, राखी फुलमाळी, अंमलदार विनोद धोंगडे, मनीष मसराम, लक्ष्मण केंद्रे, प्रीतम इंगळे, बादल देशमुख यांनी केली.

# आर्थिकदृष्ट्या सक्षम करून मच्छिमारांच्या आयुष्यात परिवर्तन आणणार–मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे

## पूर्व विदर्भातील मच्छिमार समस्यांबाबत आढावा बैठक

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

खाऱ्या पाण्यातील आणि गोड्या पाण्यातील मासेमारी व्यवसाय हा पूर्णत: वेगळा आहे. विदर्भात गोड्या पाण्यावर आधारीत मासेमारी व्यवसाय होत असून येथील मच्छिमारांच्या समस्यांची आपण गांभिर्याने दखल घेतली आहे. या खात्याचा मंत्री म्हणून येथील मच्छिमारांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे व त्यांच्या आयुष्यात आमुलाग्र परिवर्तन आणणे, हेच आपले ध्येय आहे, असे मत राज्याचे मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांनी व्यक्त केले.माजी मंत्री शोभाताई फडणवीस यांच्या पुढाकारातून पूर्व विदर्भातील मच्छिमारांच्या समस्यांबाबत नियोजन भवन येथे आयोजित आढावा बैठकीत मंत्री श्री. राणे बोलत होते. यावेळी मंचावर आमदार किशोर जोरगेवार, जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी., मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन, मनपा आयुक्त विपीन पालीवाल, मत्स्यव्यवसाय विभागाचे प्रादेशिक उपायुक्त सुनील जांभुळे, सहायक आयुक्त अविनाश नाखवा, शुभम कोमरीवार, मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी दिनेश धोपे, श्री. केशवे आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सुचनेनुसार, गोड्या पाण्यावर आधारीत मच्छिमारांसाठी सक्षम धोरण राबविण्यात येणार आहे, असे सांगून मत्स्यव्यवसाय मंत्री श्री. राणे म्हणाले, मासळी उत्पादनात वाढ करणे आणि त्यातून मच्छिमारांच्या आयुष्यात परिवर्तन आणणे, ही माझी जबाबदारी आहे. मासेमारी व्यवसाय करणारे समाधानी आणि आर्थिक सक्षम असले पाहिजे, हेच आपल्या विभागाचे ध्येय आहे. सरकार म्हणून आम्ही मच्छिमारांच्या पाठीशी उभे आहोत, हे कृतीतून दाखविण्यासाठी दर १५ दिवसांतून याबाबत नियमित आढावा घेण्यात येईल.

तलावातील अतिक्रमणबाबत मंत्री श्री. राणे म्हणाले, अतिक्रमण ठेवून मासळी उत्पादन वाढू शकत नाही. तलावात झालेल्या अतिक्रमणमुळे मच्छिमारांचे तसेच सरकारचेसुध्दा नुकसानच आहे. अतिक्रमण हटविणे हे प्राधान्य ठेवून पाटबंधारे तसेच जि.प. लघु पाटबंधारे विभागाने तलावातील अतिक्रमण काढण्यासाठी कालबध्द कार्यक्रम तयार करावा. यासाठी यंत्रणा कामाला लावा. मंत्रालयीन स्तरावर निधीसह आवश्यक ती मदत देण्यास आपण तयार आहोत. अतिक्रमण काढण्यासाठी आवश्यकता असल्यास पोलिस प्रशासनाचीसुध्दा मदत घ्यावी.



तलावातील गाळ काढणे हा महत्वाचा विषय असून गाळामुळे मासळी उत्पादन कमी येते. त्यामुळे अतिक्रमण, गाळ व इतर अनुषंगीक विषयांबाबत जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, आयुक्त व संबंधित विभागाने एकत्रित समन्वयातून कालबध्द आराखडा तयार करावा. हा आराखडा त्वरीत मंत्रालयात पाठवावा. निधीची तरतूद करण्यास अडचण येऊ देणार नाही. राज्यातील मासळी उत्पादन वाढविण्यासाठी गोड्या पाण्यावर अवलंबून असलेल्या मच्छिमारांसाठी योग्य नियोजन करावे. कोल्डस्टोरेजची व्यवस्था करावी. तसेच महानगर पालिका स्तरावर व जिल्ह्यात तालुका, ग्रामपंचायत स्तरावर मच्छिमारांना बसण्यासाठी एक जागा ठरवून द्यावी.या विभागाचा मंत्री म्हणून दर १५ दिवसांनी याबाबत आढावा घेऊन मच्छिमारांचे समाधान करण्यात येईल. ही बाब विभागाच्या अधिकाऱ्यांनी गांभिर्याने घेऊन योग्य नियोजन करावे. मच्छिमार कल्याण महामंडळात अधिकाऱ्यांपेक्षा मच्छिमार प्रतिनिधींची संख्या जास्त असावी, तसेच बचत गटांऐवजी मच्छिमारांनाच तलाव देण्यासाठी शासन स्तरावरून निर्णय घेण्यात येतील, असेही मंत्री नितेश राणे यांनी सांगितले.

मच्छिमारांच्या समस्या मांडतांना माजी मंत्री शोभाताई फडणवीस म्हणाल्या, पूर्व विदर्भातील सहा जिल्ह्यात गोड्या पाण्यावर आधारीत मासेमारी केली जाते. शेती आणि मालगुजारीकरीता येथे ब्रिटीशकालीन तलाव आहेत. या तलावांवर मोठ्या प्रमाणात अतिक्रमण झाले असून तलावांची अतिशय वाईट परिस्थिती आहे. जंगलव्याप्त क्षेत्रातसुध्दा अनेक तलाव असून तलावांचे खोलीकरण करण्यात आले नाही. कागदावर आणि अस्तित्वात असलेल्या तलावांच्या संख्येत तफावत आहे. मासळी ठेवायला कोल्ड स्टोरेज नाही. शासनाकडून केवळ खाऱ्या पाण्यातील मच्छिमारांचाच विचार केला जातो, गोड्या पाण्यातील मच्छिमारांकडे मात्र दुर्लक्ष होते. मच्छिमार कल्याण महामंडळ बरखास्त करावे किंवा या महामंडळात अधिकाऱ्यांपेक्षा मच्छिमार प्रतिनिधींची संख्या जास्त असावी. जि.प.चे तलाव बचत गटांना देऊ नये, अशा विविध मागण्या त्यांनी केल्या. यावेळी प्रादेशिक उपायुक्त सुनील जांभुळे यांनी सादरीकरण केले. बैठकीला मत्स्यव्यवसाय करणाऱ्या सहकारी संस्थांचे प्रतिनिधी तसेच मासेमारी करणारे मच्छिमार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मराठी प्राध्यापक परिषदेच्या ३५ व्या अधिवेशनाने प्राध्यापकांना काय दिले?

**भंडारा जिल्ह्यातील लाखनी तालुकास्थळी १७ व १८ जानेवारीला मराठी प्राध्यापक परिषदेचे ३५ वे अधिवेशन थाटात संपन्न झाले. समर्थ महाविद्यालयात संपन्न झालेल्या या अधिवेशनात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर आणि गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली या दोन्ही विद्यापीठातील मराठी विषयाचे अध्यापन करणाऱ्या प्राध्यापकांनी भरभरून प्रतिसाद दिला. प्राध्यापकांच्या उपस्थितीने गर्दीचा उच्चांक मोडला. हे अधिवेशन आटोपून घरी परतत असताना या अधिवेशनात प्राध्यापकांना काय मिळाले? त्यांना नेमके काय वाटते? हे या प्रतिक्रियांच्या माध्यमातून जाणून घेण्याचा अल्पसा प्रयत्न मराठीतील अग्रगण्य दैनिक राखणदार ने केला आहे. या उपक्रमात दोन्ही विद्यापीठातील अनेक प्राध्यापकांनी आपल्या प्रतिक्रिया पाठविल्या आहेत. त्यातील काही निवडक प्रतिक्रिया वाचकांसाठी देत आहोत.**











समान नोकरीव्यवसाय असलेल्या समूहांचे अधिवेशन ही संकल्पना सध्याच्या काळात सार्वत्रिक स्वरूपाची झाली आहे. अशा अधिवेशनांकडे आनंदपर्वणी म्हणून किंवा सहलपर्वणी म्हणून पाहण्याची अनेकांची रीत आहे किंवा दोन-तीन दिवसाचा विरंगुळा म्हणूनही अशा अधिवेशनांना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे; परंतु नुकतेच लाखनी येथील समर्थ महाविद्यालयात पार पडलेले राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ व गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नित मराठी प्राध्यापकांचे ३५ वे अधिवेशन दोन्ही विद्यापीठांमधील मराठीच्या प्राध्यापकांसाठी नव्या उत्साहाची आणि नव्या ज्ञानआकलनाची पर्वणीच ठरली. या अधिवेशनाला एखाद्या संमेलनाचे रूप होते. प्रत्येक अधिवेशनाचा उद्घाटन समारंभ थाटात होतो, तसा याही अधिवेशनाचा उद्घाटन समारंभ थाटात पार पडला. अधिवेशनाचे उद्घाटक नागपूर उच्च शिक्षण विभागाचे सहसंचालक डॉ. संतोष चव्हाण, प्रमुख अतिथी म्हणून लाभलेले मराठी भाषा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. अविनाश आवलगावकर, पूर्वाध्यक्ष डॉ राजेंद्र नाईकवाडे इत्यादिंनी अधिवेशनाची सुरूवात दमदार करून दिली. अधिवेशनाध्यक्ष प्राचार्य डॉ. अजय चिकाटे यांचे अध्यक्षीय भाषण मला अत्यंत उद्बोधक आणि सर्वस्पर्शी स्वरूपाचे वाटले. झाडीपट्टीतील सांस्कृतिक वारशाची चर्चा करतानाच त्यांनी नवे शैक्षणिक धोरण, मराठीचा अभ्यासक्रम, मराठी भाषा वैभव, अभिजात मराठीचे भवितव्य, वाङ्मयीन संस्कृती आणि वाङ्मयीन अभिरुची यावर नेमकेपणाने पण मार्मिक भाष्य केले. अधिवेशनाध्यक्षांच्या भाषणाने उद्घाटकीय समारंभाला वेगळ्या उंचीवर नेले.

मराठी प्राध्यापक परिषदेच्या अधिवेशनांना मी आजपर्यंत अनेकदा उपस्थिती लावली आहे. प्रत्येक अधिवेशन हे त्यांच्या आयोजनातील वैशिष्ट्यपूर्णतेमुळे वेगळे ठरले आहेच. ३५ व्या अधिवेशनात सुद्धा खूप वेगळेपणा माझ्या दृष्टीने मला जाणवला. या अधिवेशनाच्या आयोजनातील अनेक गोष्टी माझ्या दृष्टीने मला फार महत्त्वाच्या वाटल्या. एक तर या अधिवेशनाने मराठीच्या अध्यापनाविषयी नितांत आस्था असलेल्या प्राध्यापकांचे एकमेवीकरण झाले. या निमित्ताने मराठीच्या अध्यापकांपुढे, मराठी भाषेपुढे आणि मराठी माणसांपुढे निर्माण झालेल्या आव्हानांची सविस्तर चर्चा घडून आली. या संदर्भात निर्माण झालेल्या विविध प्रश्नांची उकल करून त्यावर उपाययोजनांचाही आढावा या अधिवेशनात घेण्यात आला. या अधिवेशनात चर्चिले गेलेले विषय अत्यंत महत्त्वाचे होते आणि या विषयावर अत्यंत गंभीर स्वरूपाची चर्चा झाली. या अधिवेशनात आपल्यातीलच प्राध्यापक मंडळी प्रमुख वक्ते म्हणून बोलत आहेत असे मला तरी जाणवत नव्हते. जवळपास सर्वांनीच ठराविक वेळेत अभ्यासपूर्ण अशी मांडणी केली. आपण नवं ज्ञान आकलन त्यांच्याकडून ऐकतो आहोत असे प्रत्येक सत्रांतील वक्तव्य ऐकताना वारंवार वाटत होते. या निमित्ताने सहभागी वक्त्यांना त्या त्या विषयाचा परिपूर्ण अभ्यास करता आला आणि सर्वांनाच नव्या विचारव्यूहातून विषयाची मांडणीही करता आली. ही या अधिवेशनातील गोष्ट मला महत्त्वपूर्ण वाटली.

या अधिवेशनाच्या निमित्ताने मला झाडीपट्टीतील भौगोलिक आणि सांस्कृतिक पार्श्वभूमीच्या जवळ जाता आले. दोन दिवस लाखनी येथे मुक्कामी असल्यामुळे लोकसंवादातून मराठीच्या या बोलीचा जवळून व प्रत्यक्ष परिचय करून घेता आला. रेस्ट हाऊसमधील कर्मचारी, चहावाला, शाळा - महाविद्यालयातील शिक्षक - प्राध्यापक, तेथील कर्मचारी, विद्यार्थी, सांस्कृतिक कार्यक्रम सादर करणारे कलापथक यांच्यामध्ये असलेल्या बोलीच्या अस्मितेची आणि झाडीबोली बोलत असल्याच्या स्वाभिमानाची रूपेही मला जाणून घेता आली.

या अधिवेशनात उपस्थित असलेले जवळपास सर्वच चेहरे ओळखीचे होते. पण या अधिवेशनामुळे जुन्या ओळखीला उजाळा मिळाला. मार्गदर्शकाच्या भूमिकेत असलेल्या वरिष्ठ व निवृत्त प्राध्यापकांशी झालेली चर्चा अतिशय उपयुक्त ठरली, प्राध्यापक म्हणून गेल्या काही वर्षांत नव्याने नियुक्त झालेल्या तरुणांशी चर्चा करताना मला मार्गदर्शकाच्या भूमिकेत वावरता आले. या अधिवेशनामुळे तेथे उपस्थित सर्वांप्रतीच मित्रत्वाचे संबंध अधिक घट्ट व दृढ झाले.

हे अधिवेशन आयोजन, नियोजन, चर्चा, विचारमंथन, व्यवस्थापन या सर्वच दृष्टीने यशस्वी झाले, या अधिवेशनाच्या यशस्वी आयोजनाचे श्रेय समर्थ महाविद्यालयाच्या टीमला जसे जाते, तसेच मराठी प्राध्यापक परिषदेच्या सर्वच पदाधिकाऱ्यांना जाते. अधिवेशनकाळातील दोन दिवस माझ्यासहित उपस्थित सर्वच मराठीच्या प्राध्यापकांसाठी नव्या ज्ञान उत्साहाची पर्वणीच ठरली हे येथे अधोरेखित केलेच पाहिजे.

**डॉ. प्रमोद नारायणे**
**प्राध्यापक, मराठी विभाग**
**यशवंत महाविद्यालय, वर्धा**

या संमेलनाचे आयोजन अतिशय सूत्रबद्ध व नियोजनबद्ध होते. या संमेलनात उद्घाटन समारंभात प्रमुख अतिथी असणारे कुलगुरू डॉ.अविनाश आवलगांवकर यांचे भाषण सर्वांना बोधप्रद ठरणारे होते. त्यांनी उपस्थित केलेले अनेक प्रश्न मराठी भाषेच्या समृद्धीसाठी महत्वपूर्ण ठरणारे आहेत. संमेलनाचे उद्घाटक डॉ. संतोष चव्हाण यांनी नवीन शैक्षणिक धोरण निश्चित करण्यामागील भूमिका व त्यामुळे विद्यार्थ्यांना त्याचा होणारा फायदा याविषयी महत्वपूर्ण माहिती दिली. शिवाय प्राध्यापकांच्या मनात निर्माण होणारा वर्कलोड संदर्भातील भ्रमही त्यांनी दूर केला. अध्यक्ष डॉ. अजय चिकाटे यांनीही आजवरच्या पूर्वाध्यक्षांच्या परंपरा जोपासत आपले चिंतन मांडले. या अधिवेशनात आयोजित करण्यात आलेले तीनही सत्रातील परिसंवाद अतिशय अभ्यासपूर्ण आणि विषयाला न्याय देणारे असेच होते. या सत्रांचे अध्यक्ष डॉ. अजय कुलकर्णी, डॉ. राजेंद्र वाटाणे व डॉ. संतोष देठे यांनीही या अनुषंगाने अभ्यासपूर्ण व विषयाला न्याय देणारे चिंतन मांडले. याप्रसंगी आयोजित करण्यात आलेला सांस्कृतिक कार्यक्रम देखील संस्कृतीची जोपासना करणारा व सामाजिक उत्तरदायित्वाची जाणीव करून देणाराच होता. दुसऱ्या दिवशी झालेले खुले निबंध वाचन प्राध्यापक व संशोधकांना दिशादर्शक ठरणारे होते. खुले अधिवेशन यात आलेले प्रश्न त्यावर झालेले विचार मंथन आणि समारोपीय सत्रामध्ये मांडले गेलेले विचार एकूणच मराठी प्राध्यापक परिषदेच्या अधिवेशनाची उपलब्धी ठरणारे होते. प्राध्यापक परिषदेचे अध्यक्ष डॉ. गणेश मोहोड, कार्याध्यक्ष डॉ. हिराजी बनपूरकर, सचिव डॉ. राजेंद्र वाटाणे आणि अन्य पदाधिकारी, सदस्य व महाविद्यालयातील प्राचार्य डॉ. दिगांबर कापसे, मराठी विभागाचे डॉ. बंडू चौधरी, डॉ. अजिंक्य भांडारकर या सर्वांची मेहनत व परिषदेविषयी असणारी आस्था याप्रसंगी दिसून आली. प्राध्यापक परिषदेची निरंतर अशीच प्रगती व्हावी हीच अपेक्षा आहे.

**डॉ. शरयू ब.तायवाडे प्राचार्य,**
**तायवाडे महाविद्यालय, कोराडी**

मराठी प्राध्यापक परिषदेच्या अधिवेशनाला उपस्थित राहण्याचा दुसऱ्यांदा योग आला. लाखणीच्या समर्थ महाविद्यालयातील प्राध्यापक परिषदेच्या या अधिवेशनादरम्यान आयोजकांची धडपड नक्कीच वाखाणण्याजोगी होती. मी सुरवातीपासुनच यातुन काय घेता येईल याच प्रयत्नात होती. या दोन दिवसीय अधिवेशनात चिंतनही होते, चर्चाही होती, मनोरंजन देखील होते. ज्वलंत प्रश्न सोडविण्यासाठी करावयाच्या प्रयत्नाबाबतची अधिवेशनातील चर्चा नवीन लोकांना खूप उपयुक्त ठरली. गंभीर विषयावरील चिकित्सक चर्चा अगदी दोन दिवसाच्या अपुऱ्या वेळेत ऐकायला मिळणे ही तर माझ्यासाठी पर्वणीच होती. मराठीतील वेगवेगळ्या क्षेत्रातील व्यक्तींचा झालेला सन्मान हाही एक महत्वाचा घटक होता.खुल्या अधिवेशनात मराठी प्राध्यापकांवरील जबाबदाऱ्या आणि आव्हानांचे वास्तवदर्शी चित्रण सर्वांसमोर ठेवले गेले ते प्रत्येक मराठी प्राध्यापकाला आत्मचिंतन करायला लावणारे होते. बोलणारा प्रत्येक वक्ता हा मराठी प्राध्यापकाला जाणीव आणि जागृत करतांना दिसत होता.



पब्लिक टॅग
डॉ.यशवंत घुमे
मो.९८२२२३३९१२

अधिवेशनात मराठी प्राध्यापकांची जणू मांदीयाळीच होती. जुने- नवे सर्व मान्यवर प्राध्यापक , गुरुवर्य ,अनेक कर्तृत्ववान व्यक्तींसोबत परिचय होण्याचे भाग्य देखील मला याप्रसंगी लाभले.एकंदरित हे अधिवेशन सुख, आनंद आणि चैतन्य निर्माण करणारे ठरले.

**डॉ. दीपिका हटवार**
**शरदचंद्र पवार कला महिला**
**महाविद्यालय चामोर्शी जि. गडचिरोली**

मराठी प्राध्यापक परिषदेचे दोन दिवसीय संमेलन म्हणजे आपली मातृभाषा मराठीचा उत्सव सोहळा! यावर्षीची ३५ प्राध्यापक परिषद समर्थ महाविद्यालय, लाखनी येथे दिनांक १७ आणि १८ जानेवारीला घेण्यात आली. समर्थ महाविद्यालयाचे संस्थाप्रमुख, प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांच्या उत्साहाला याप्रसंगी उधाण आले होते. अतिशय प्रफुल्लित वातावरणात पाहुणे मंडळींचे मराठमोळ्या पेहरावातील हसतमुख मुलींनी स्वागत केले. प्रांगणात प्रवेश करताच लक्ष वेधून घेतले ते विद्यार्थ्यांनी. सुंदर, रेखीव रांगोळ्यांनी दाखविलेली आपली महाराष्ट्रीयन संस्कृती. मायमराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याने झालेला आनंद सर्वांच्या चेहऱ्यावर ओसंडत होता.

'ही मायभूमी, ही जन्मभूमी, कर्मभूमी ही आमुची । महावंदनीय अति प्राणप्रिय ही माय मराठी आमुची' या ओजस्वी गीताने या परिषदेचा प्रारंभ झाला. याप्रसंगी मा. डॉ. अविनाश आवलगावकर कुलगुरू, मराठी भाषा विद्यापीठ रिद्धपूर, नम्रता बागडे मराठी विभागप्रमुख उस्मानिया विद्यापीठ हैदराबाद मा. आल्हादजी लाखनीकर अध्यक्ष राष्ट्रीय शिक्षण संस्था लाखनी, प्राध्यापक परिषदेचे पूर्वाध्यक्ष मा. डॉ .राजेंद्र नाईकवाडे आणि अधिवेशनाध्यक्ष मा. डॉ. अजय चिकाटे मंचावर उपस्थित होते; तर समोर अनेक ख्यातनाम साहित्यिक, अभ्यासकांची मांदियाळी लक्ष वेधून घेत होती.या कार्यक्रमात झाडीबोली साहित्याचे अभ्यासक हरिश्चंद्र बोरकर आणि डॉ. राजन जयस्वाल (नागभीड) यांचा आदरपूर्वक सन्मान करण्यात आला.

अध्यक्षीय भाषणात डॉ. अजय चिकाटे यांनी प्रसारमाध्यमांच्या बडेजाव असणाऱ्या या काळात वाचन संस्कृती ऱ्हास पावेल की काय अशी भीती वाटत असताना विचारांचा दर्जेदारपणा, कल्पकता, लेखनशैली यासाठी वाचनाला पर्याय नाही आणि यामुळे पुस्तकांची मागणी वाढती राहणारच आहे असे सांगितले. आपल्या भाषणात अनेक मुद्यांवर चिंतन करत नव्या शिक्षण धोरणानुसार अभ्यासक्रमात शासनाने जी आदर्श तत्त्वे घालून दिली आहेत त्या बरहुकूम अभ्यासक्रमाची निवड व्हावयास पाहिजे. लोकशाहीचे संवर्धन, प्रबोधन आणि उत्तम नागरिक घडविणारा अभ्यासक्रम असायला पाहिजे. जागतिकीकरण सापेक्ष शैक्षणिक धोरण आणणे ही काळाची गरज असली तरी भारतीय सामाजिक वास्तव, खेड्यापाड्यांची दशा, शेतकरी-शेतमजूर, जंगल शिवारात राहणारा दारिद्र्याचे चटके सोसणारा समाज या बाबींचा नव्या शैक्षणिक धोरणात फारसा विचार झालेला नाही असे विचार मांडले. परंपरागत अभ्यासाला प्राधान्य देणाऱ्या या धोरणाने जुन्या समाजव्यवस्थेचे पुनरुत्थान होणार की काय ही भीतीही यावेळी अध्यक्षांनी बोलून दाखविली.या दोन दिवसीय प्राध्यापक परिषदेत विविध सत्रांमध्ये निमंत्रित करण्यात आलेल्या अभ्यासक, मान्यवरांची मराठी भाषा वास्तव आणि भवितव्य, साहित्य संमेलने चिंता आणि चिंतन, नवीन शैक्षणिक धोरण दिशा आणि दशा या विषयांवरची महत्त्वपूर्ण व्याख्याने झाली. एकूण मराठी भाषा, प्राध्यापकांची जबाबदारी, अभ्यासक्रम, साहित्य, संस्कृती आणि नवे शैक्षणिक धोरण या अनुषंगाने खूप चांगले मंथन या परिषदेत घडून आले.

**डॉ. सुनंदा जुलमे,**
**कमला नेहरू महाविद्यालय नागपूर.**

समर्थ महाविद्यालय, लाखनी येथे मराठी प्राध्यापक परिषदेचे ३५ वे अधिवेशन हीरक महोत्सवी वर्षाचे औचित्य साधून मोठ्या उत्साहात संपन्न झाले. यापूर्वी, ३४ व्या अधिवेशनासाठी आम्ही म्हणजे माझे बंधू आणि मराठी विभागप्रमुख डॉ. बंडू चौधरी, डॉ. नीलिमा कापसे आणि मी डॉ. मधुकर वासनिक पीडब्ल्यूएस महाविद्यालय, नागपूर येथे उपस्थित होतो. हा माझ्यासाठी मराठी प्राध्यापक परिषदेच्या अधिवेशनाचा पहिलाच अनुभव होता. त्यावेळी आमच्या महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिगांबर कापसे सर यांना अधिवेशनाचा अहवाल सादर करत असताना त्यांनी पुढील अधिवेशन आपल्या महाविद्यालयात घेण्याची इच्छा व्यक्त केली. अधिवेशनाचे यशस्वी आयोजन ही आमच्यासाठी एक मोठी जबाबदारी होती. या संकल्पनेला प्रत्यक्षात आणण्यात डॉ. सत्यवान मेश्राम आणि डॉ. गुरुप्रसाद पाखमोडे यांचा सिंहाचा वाटा होता. माजी विद्यार्थी आणि माजी अधिवेशन अध्यक्ष या भूमिकेतून त्यांनी सतत मार्गदर्शन केले. या अधिवेशनाच्या तयारीत माझ्यासाठी वैयक्तिकदृष्ट्या ही आनंददायी संधी ठरली, कारण मला अनेक नामांकित व्यक्तींबरोबर काम करण्याचा अनुभव आला. अर्थात कुलगुरू डॉ. अविनाश आवलगांवकर सरांसोबत बोलता आले.पूर्व अधिवेशनाध्यक्ष डॉ. राजेंद्र नाईकवाडे, अधिवेशनाध्यक्ष डॉ. अजय चिकाटे, मराठी प्राध्यापक परिषदेचे अध्यक्ष डॉ. गणेश मोहोड, डॉ. राजेंद्र वाटाणे, माझे मार्गदर्शक डॉ. कोमल ठाकरे आणि डॉ. विजय रेवतकर यांच्या सहकार्यामुळे अधिवेशनाचे नियोजन अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने पार पडले. पत्रिका आणि प्रमाणपत्रांच्या डिझाईनपासून तर समापन सत्राच्या आभारापर्यंत डॉ राजेंद्र नाईकवाडे सरांची कार्यशैली जवळून पाहता आली.अधिवेशनाच्या यशामागे समर्थ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिगांबर कापसे आणि मराठी विभागप्रमुख डॉ. बंडू चौधरी यांची महत्त्वाची भूमिका होती. त्यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण कार्यप्रक्रिया यशस्वीरीत्या पार पडली.या अधिवेशनामुळे अनेक नवीन प्राध्यापक मित्र मिळाले आणि समविचारी लोकांशी संवाद साधण्याची संधी मिळाली. मराठी प्राध्यापक परिषदेचे अधिवेशन म्हणजे मराठी भाषेच्या प्रचार आणि प्रसारासाठी एक अद्वितीय शिदोरी, मेजवानी किंवा मांदियाळीच ठरते, असे म्हणणे वावगे ठरणार नाही.या अधिवेशनाने मला केवळ ज्ञानाचा साठाच दिला नाही, तर मराठी साहित्याच्या सेवेसाठी प्रेरणा आणि ऊर्जा दिली. हा अनुभव कायम स्मरणीय राहील.

**प्रा. अजिंक्य भांडारकर**
**समर्थ महाविद्यालय, लाखनी**

मराठी प्राध्यापक परिषदेच्या ३५ व्या अधिवेशनाने माझ्यासारख्या नवख्या प्राध्यापकाला उजेडात आणण्याचे काम केले आहे. एवढे मोठे अधिवेशन घेण्याची जबाबदारी मी पेलू शकणार की नाही याची शाश्वती नसताना प्राचार्यांनी माझ्या सामाजिक कामाची दखल घेत ही जबाबदारी दिली व यातून नियोजन क्षमता दाखविता आली. एवढेच नाही तर माझे अनेक गुरुवर्य मार्गदर्शकांनी अधिवेशनात उपस्थिती दर्शवून माझ्या पाठीवर हात ठेवला. त्यामुळे मला सकारात्मक ऊर्जा प्राप्त होईल. विद्यापीठामध्ये आमच्या काळात ज्या कॉन्फरन्स झाल्या त्यातील अनुभव कामात आला. विद्यार्थी दशेत माझी बंडू म्हणून असणारी ओळख प्रत्यक्षात फळास आली. कळत नकळत अनेकांनी मला मोलाचे सहकार्य केले मी त्यांच्या ऋणातच राहू इच्छितो.

**डॉ. बंडू चौधरी**
**मराठी विभागप्रमुख व संयोजक मराठी**
**प्राध्यापक परिषद ३५ अधिवेशन**
**समर्थ महविद्यालय, लाखनी**

# भद्रावती येथे पंचशील मंडळाद्वारे विविध कार्यक्रमांचे आयोजन

**भद्रावती । प्रतिनिधी**

स्थानिक पंचशील मंडळ भद्रावती द्वारा संचालित समता के.जी. स्कूल भद्रावती च्या वतीने ७६ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त ध्वजारोहण कार्यक्रम मुनेश्वर गौरकर यांच्याहस्ते करण्यात आला. डॉ. दीपा चांदेकर यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून भारतीय संविधान उद्देशिकेचे सामूहिक वाचन केले. प्रज्ञा विकास वाचनालयाच्यावतीने वाचन संकल्प महाराष्ट्राचा उपक्रमाअंतर्गत दिनांक १७ जानेवारीला प्रज्ञा विकास वाचनालय भद्रावती येथे घेण्यात आलेल्या निबंध स्पर्धेचे बक्षिस व प्रमाणपत्र वितरण प्रभाकर डोंगरे ( माजी मुख्याध्यापक सरस्वती विद्यालय मुधोली) यांच्या हस्ते करण्यात आले.




त्याप्रसंगी प्रथम क्रमांक चैतन्य वामन बुच्चे जि. प. हायस्कूल भद्रावती यांने पटकाविला. द्वितीय क्रमांक श्रेया मिलिंद खोब्रागडे, विवेकानंद विद्यालय भद्रावती, तृतीय क्रमांक तेजस देवेंद्र वानखेडे याने पटकावला. त्यानंतर सायंकाळी समता के. जी. स्कूल भद्रावती येथील विद्यार्थ्यांचे प्रजासत्ताक दिनानिमित्त सांस्कृतिक नृत्य कार्यक्रम सादर करण्यात आले. कार्यक्रमाच्या तयारीकरीता मुख्याध्यापिका आष्टीकर , मून , खोब्रागडे,रायपुरे ईत्यादीचे मोलाचे सहकार्य लाभले. त्याप्रसंगी प्रेक्षक पालक वर्गाचा प्रचंड प्रमाणात उत्साहपूर्ण सहभाग होता. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मंडळाचे अध्यक्ष मुनेश्वर गौरकार, उपाध्यक्ष राजेंद्र पाटील, सचिव प्रदीप धोंगडे, विकास दुबे, डॉ. दीपा चांदेकर, पदाधिकारी नामदेव रामटेके, ईश्वरदास मस्के, भगतकर, राजहंस मेश्राम, रमेश कांबळे, आशिष दुपारे, प्रणित चहांदे, सोनल वावरे, कुलदीप लोणारे, रितेश मेश्राम, नगरातील युवक-युवती, महिला वर्ग यांनी अथक परिश्रम घेऊन कार्यक्रम यशस्वीरीत्या उत्साहात पार पडला.

# महाड ज्येष्ठ नागरिक संघाच्या अध्यक्षपदी सुभाष भाई शेठ,उपाध्यक्षपदी संतोष शेठ यांची बिनविरोध निवड

**महाड । प्रतिनिधी**

महाड ज्येष्ठ नागरिक संघाच्या कार्यकारी मंडळाची मुदत संपल्याने निवडणूक अधिकारी भाईदास शिरसाठ यांनी नवीन कार्यकारिणीसाठी निवडणूक प्रक्रिया जाहीर केली. अध्यक्ष आणि उपाध्यक्ष पदांसाठी अर्ज मागवण्यात आले होते, मात्र शेवटच्या तारखेपर्यंत इतर कोणत्याही उमेदवाराने अर्ज न भरल्याने अध्यक्षपदी सुभाष भाई शेठ आणि उपाध्यक्षपदी संतोष शेठ यांची बिनविरोध निवड जाहीर करण्यात आली.




याचप्रमाणे, संघाच्या इतर पदाधिकाऱ्यांचीही निवड करण्यात आली. सचिवपदी डॉ. चंद्रकांत डोसी, सहसचिवपदी शर्मिला धारप, तर कोषाध्यक्षपदी भारत मेहता यांची निवड झाली. नवीन कार्यकारिणी सदस्य म्हणून अनिल सलागरे, मधुकर शेलार, श्रीकांत सहस्रबुद्धे, अशोक सतेरे, मोरेश्वर धामणसे, श्रीकांत शेठ, हरिलाल दोसी, मधुकर मेहता, हिरामण अंबवले, अनंत सावंत, श्यामप्रसाद घोसाळकर, धनजी गांधी, अरूण भाई गांधी. महिला कार्यकारिणी सदस्य म्हणून सुजाता शेठ, अंजली मशेटे, शर्मिला धारप, माधुरी धामणसे, राजश्री शहा, अनघा सावंत, सुनीता गांधी, वीणा वडके, शिला साबळे, विनया जोशी, वैशाली वनारसे. तर सल्लागार समितीत राम वडके, अनंत टमके, भाईदास शिरसाठ. यांची निवड करण्यात आली . महाड ज्येष्ठ नागरिक संघ गेली २१ वर्षे कार्यरत असून, रायगड जिल्ह्यात सर्वाधिक सभासद असलेला संघ म्हणून ओळखला जातो. संघाच्या वतीने विविध उपक्रम आणि समाजोपयोगी कार्य राबवले जाते. नवीन पदाधिकारी आणि कार्यकारिणीच्या निवडीबद्दल सर्व सभासदांनी त्यांचे अभिनंदन केले.

# महाराष्ट्र विश्वकर्मामय सुतार (झाडे) समाजाच्या वतीने उपवर-उपवधू परिचय मेळाव्याचे आयोजन

## विवाह दोन कुटुंबांसह संपूर्ण समाजाला बांधणारा पवित्र बंध-आ.किशोर जोरगेवार

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

उपवर - उपवधू परिचय मेळावे ही आपल्या समाजासाठी अत्यंत महत्त्वाची संकल्पना आहे. विवाह हा केवळ दोन व्यक्तींमधील संबंध नाही, तर दोन कुटुंबे आणि संपूर्ण समाजाला बांधणारा पवित्र बंध असतो. विवाह हे केवळ दोन हृदयांचे मिलन नसून, समान विचारधारा आणि परस्पर सहकार्याचा आधार असतो. आपल्या समाजात आदर्श विवाह घडावेत, कुटुंबसंस्था मजबूत राहावी यासाठी असे मेळावे मोलाचे कार्य करतात, असे प्रतिपादन आमदार किशोर जोरगेवार यांनी केले.

आज रविवारी महाराष्ट्र विश्वकर्मामय सुतार (झाडे) समाजाच्या वतीने उपवर-उपवधू आणि पालक परिचय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी ते बोलत होते. या कार्यक्रमाला शिक्षक विभागाचे आमदार सुधाकर अडबाले, ज्योती राखुंडे, सतीश माणुसमारे, संतोष बोरिकर, रतन पोले, वासुदेव वांढरे, प्रभाकर नवघरे, प्रमोद मानुसमारे, प्रदीप जानवे, नरेंद्र बनकर, जगदीश दुधलकर, डॉ. राजेश शास्त्रकार, अरुणा मत्ते आदी मान्यवरांची मंचावर उपस्थिती होती.

यावेळी पुढे बोलताना आ. जोरगेवार म्हणाले की, मागील पाच वर्षांत आपण अनेक विकासकामे केली. ही विकासकामे करत असताना समाजाला उपयोग होईल याचा विचार केंद्रस्थानी राहिला. अनेक समाजांना समाजभवनासाठी निधी देण्याचे काम आपण केले आहे. सुतार (झाडे) समाजालाही समाजभवन निर्माण करायचे असेल आणि आपल्याकडे जागा उपलब्ध असेल, तर या जागेवर समाजभवन निर्माण करण्यासाठी १ कोटी रुपयांचा निधी देणार, अशी



घोषणा आमदार किशोर जोरगेवार यांनी केली.

आपण समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी सदैव कटिबद्ध आहोत. सरकारी योजनांचा लाभ, उद्योग-व्यवसायासाठी मदत आणि शिक्षणासाठी अधिक संधी निर्माण करण्यासाठी माझे पूर्ण सहकार्य समाजातील होतकरू युवकांना राहील. आपला सुतार (झाडे) समाज हा परिश्रम, कौशल्य आणि सचोटी यासाठी ओळखला जातो. आपल्या पूर्वजांनी लाकूडकलेचा आपल्याला एक महान वारसा दिला आहे. आजच्या स्पर्धेच्या युगात आपण या परंपरेला आधुनिकतेसोबत जोडून पुढे न्यायला हवे.

आपल्या समाजाने लाकूडकाम, गृहनिर्माण आणि फर्निचर व्यवसायात अमूल्य योगदान दिले आहे. आज आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून हा व्यवसाय अधिक प्रगत करता येईल. डिजिटल मार्केटिंग, ऑनलाइन प्लॅटफॉर्म आणि नव्या यंत्रसामग्रीच्या मदतीने आपण आपला व्यवसाय जागतिक स्तरावर नेऊ शकतो. नोकरीच्या शोधात न थांबता आपणच नवीन संधी निर्माण करायला हव्यात. लघु व मध्यम उद्योग, स्टार्टअप आणि स्वयंपर्यायी व्यवसाय यात मोठी संधी आहे. टाकाऊपासून टिकाऊ, पर्यावरणपूरक फर्निचर असे नवे ट्रेंड आत्मसात करा, असे आवाहन यावेळी आमदार किशोर जोरगेवार यांनी केले.या कार्यक्रमाला समाजबांधवांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# साहेब,अजून किती वर्षे पाण्या साठी संघर्ष करावा लागेल?

## येल्लापूर येथील नागरिकांची जिल्हा प्रशासनाला विनंती




**जिवती । प्रतिनिधी**

तेलंगणा सीमेलगत असलेल्या येल्लापूर ग्रामपंचायतीत पाणीटंचाईची समस्या दिवसेंदिवस तीव्र होत आहे. गाव बसले तेव्हापासूनच पाणीपुरवठ्याचा प्रश्न ऐरणीवर असून, फेब्रुवारी महिन्यातच भूजलपातळी मोठ्या प्रमाणात खालावते. त्यामुळे एप्रिल-मे महिन्यांत गावकरी पाण्यासाठी स्थलांतर करण्यास मजबूर होतात.

शासनाने कोट्यवधी रुपये खर्चून जलजीवन मिशन अंतर्गत येल्लापूर येथे पाणीपुरवठा प्रकल्प उभारला आहे. मात्र, या प्रकल्पाच्या अक्षम्य निष्काळजीपणामुळे गावकऱ्यांच्या समस्या सुटण्याऐवजी वाढल्या आहेत. बांधण्यात आलेल्या पाण्याच्या टाकीला आतापासूनच गळती लागली असून, संबंधित कंत्राटदार टाकीला केवळ रंगकाम करून या अपूर्ण कामावर पडदा टाकण्याचा प्रयत्न करीत आहे. यामुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप आहे.

गावातील सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, तंटामुक्ती समिती अध्यक्ष आणि ग्रामस्थांनी एकत्र येऊन निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर केले आहे. त्यांनी तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली असून, पाणीपुरवठा अधिकाऱ्यांकडे देखील तक्रार नोंदवली आहे. येल्लापूर येथे जलजीवन मिशनचे काम निकृष्ट दर्जाचे असून, त्यास जबाबदार असलेल्या कंत्राटदारावर कारवाई करण्याची मागणी गावकऱ्यांनी केली आहे.

### तपासणीसाठी पाणीपुरवठा अधिकाऱ्यांची हमी

**मी स्वत: येल्लापूर येथे येऊन जलजीवन मिशनचे काम तपासणार असून, संबंधित कंत्राटदाराला उपस्थित राहण्याचे सक्त आदेश देईन. अपूर्ण आणि निकृष्ट दर्जाचे काम दुरुस्त करून ते पूर्ण करण्यास सांगण्यात येईल. येत्या पाच-सहा दिवसांत मी गावाला भेट देईन आणि हा प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्नशील राहीन.**

**- हर्ष भोवरे, ग्रामीण पाणीपुरवठा अधिकारी, चंद्रपूर**

### एकमेव विहिरीची दयनीय अवस्था

**गावामध्ये शौर्यस्तंभाजवळील एकमेव विहीर पिण्याच्या पाण्याचा स्रोत आहे. मात्र, ती अर्धवट कोसळली असून एप्रिल-मे महिन्यात या विहिरीचे पाणी आटते. परिणामी, जनावरे आणि माणसे पाण्यावाचून अर्धमेला होतात. काही नागरिक टंचाईच्या काळात गाव सोडून स्थलांतर करतात.ग्रामस्थांनी आमदारांना विनंती केली आहे की, या अत्यंत गंभीर प्रश्नावर त्वरित निर्णय घ्यावा आणि येल्लापूर गावाचा पाणीप्रश्न कायमस्वरूपी मार्गी लावावा.**

**-सुबोध चिकटे, ग्रामस्थ, येल्लापूर**

# रांजणगाव येथे हीलिंग लाइव्हस कुटुंब मेळावा २०२५ उत्साहात संपन्न



**शिरूर । प्रतिनिधी**

श्रीक्षेत्र रांजणगाव गणपती (ता. शिरूर) येथील मंदिर परिसरातील सभागृहात हीलिंग लाइव्हस या सामाजिक संस्थेचा एच एल कुटुंब मेळावा २०२५ उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात संस्थेच्या जागतिक स्तरावर सकारात्मक उर्जास्त्रोत असलेल्या कुटुंबाची एकत्रित बैठक घेण्यात आली.

यावेळी महाराष्ट्र हेड संतोष सांबारे, देवस्थान ट्रस्ट सचिव डॉ. तुषार पाचुंदकर पाटील, शिरूर तालुका ग्रंथालय संघ अध्यक्ष तथा द युवा ग्रामीण पत्रकार संघ राज्य सहसचिव विवेकानंद फंड, विजय पाचंगे, डॉ. भारती पडवळ, सीमा संकपाळ, नितीन अवचर, सचिन ठाणगे, प्रणित दसगुडे, हरीश अवचर, उज्ज्वला इचके यांनी संस्थेविषयी आपली मनोगते व्यक्त केली.

या कार्यक्रमास सुनिल पडवळ, संतोष झंजाड, डॉ. प्रणव हेशी, गौतम कर्डिले, राहुल पवार, शुभम मलगुंडे, प्रमोद नरवडे, रोहन मलगुंडे यांची उपस्थिती होती. संस्थेत नव्याने सहभागी झालेल्या स्वयंसेवकांना गुलाबपुष्प व टी-शर्ट देऊन सन्मानपूर्वक कुटुंबात सामील करून घेण्यात आले. कार्यक्रमाचे आयोजन स्वप्निल फलके, बाबासाहेब झावरे, पृथ्वीराज सांबारे, ओंकार सरोदेयांनी केले. तर डॉ. निकिता तळेकर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. हीलिंग लाइव्हस संस्थेच्या एचएल कुटुंब मेळावा २०२५ च्या माध्यमातून सामाजिक बांधिलकी वृद्धिंगत करण्याचा संकल्प करण्यात आला. कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला.

# रणसिंग महाविद्यालयासाठी एक कोटी निधी क्रीडामंत्री दत्तात्रय भरणे यांची घोषणा

**इंदापूर । प्रतिनिधी**

इंदापूर तालुका ग्रामविकास प्रतिष्ठान संचलित विश्वासराव रणसिंग महाविद्यालय, कळंब येथे आयोजित विश्वास महोत्सव स्नेहसंमेलनात क्रीडामंत्री दत्तात्रय भरणे यांनी महाविद्यालयासाठी बंदिस्त प्रेक्षागृहाच्या उभारणीसाठी एक कोटी रुपयांच्या निधीची घोषणा केली.



कार्यक्रमाचे उद्घाटन वालचंदनगर पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक राजकुमार डुणगे यांच्या हस्ते झाले. यावेळी मंत्री भरणे यांनी विद्यार्थ्यांना आत्मविश्वास वाढवण्यासाठी विविध कला व गुणदर्शन सादर करण्याची संधी मिळत असल्याचे सांगितले. त्यांनी मेहनतीचे महत्त्व सांगत, कोणतीही गोष्ट कष्टाशिवाय मिळत नाही, असे स्पष्ट केले.

संस्थेच्या माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थिनींचा केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते सन्मान होणे ही प्रतिष्ठानसाठी अभिमानाची बाब असल्याचे भरणे यांनी नमूद केले. याशिवाय, राष्ट्रीय स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थिनी काजल जाधव हिचा सत्कारही करण्यात आला.

स्व. विश्वासदादा रणसिंग व स्व. अण्णासाहेब हेगडे यांनी लावलेल्या रोपट्याचा आज वटवृक्ष झाल्याचे सांगत, त्यांची दुसरी पिढी यशस्वीपणे संस्था चालवत असल्याचे भरणे यांनी सांगितले. संस्था सचिव वीरसिंह रणसिंग यांनी, संस्था आणि रणसिंग कुटुंब शेवटच्या श्वासापर्यंत भरणे मामा तुमच्या सोबत राहील अशी ग्वाही दिली.

संस्था अध्यक्ष आनंदी रणसिंग, उपाध्यक्ष प्रकाश कदम, सचिव वीरसिंह रणसिंग, विश्वस्त कुलदीप हेगडे, शंकरराव रणसिंग, राही रणसिंग, प्राचार्य विजय केसकर, उपप्राचार्य ज्ञानेश्वर गुळीग, स्नेहसंमेलन अध्यक्ष राजेंद्रकुमार डांगे, सांस्कृतिक विभाग प्रमुख विद्या गुळीग, क्रीडा संचालक सुहास भैरट, श्री छत्रपती सहकारी साखर कारखान्याचे संचालक अभिजीत रणवरे, वालचंद विद्यालय प्राचार्य सुरेश अर्जुन, मुख्याध्यापक प्रमोद भोंग, मुख्याध्यापिका मंगल सूर्यवंशी, निमसाखर सरपंच धैर्यशील रणवरे, कुरवली सरपंच राहुल चव्हाण, चिखली सरपंच उत्तम खोमणे, पोलीस पाटील विलास कणसे, पंचायत समिती माजी सदस्य सुहास डोंबाळे आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते. कार्यक्रमास कळंब, कुरवली, चिखली, वालचंदनगर, रणगाव, निमसाखर, निरवांगी आदी परिसरातील विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# माजी आमदार जयवंतराव जगताप यांचा जनता दरबार

## गोरगरिबांना न्याय मिळवून देण्याची वचनबद्धता

**सोलापूर । प्रा.राजेश गायकवाड**

करमाळा तालुक्यातील राजकारणात एक आगळीवेगळी क्रेझ असलेल्या जयवंतराव नामदेवराव जगताप यांना जेजे म्हणून ओळखले जाते. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची छाप सोलापूर जिल्ह्यातच नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्रात उमठली आहे. माजी आमदार जगताप यांच्या वडिलांनी सोलापूर जिल्ह्यात राजकारणात एक ठसा उमठवला, आणि त्यांचे स्वतःचे योगदानही त्याच पद्धतीचे आहे.

जयवंतराव जगताप यांचा राजकीय प्रवास त्यांच्या स्वकर्तुत्वाने सुरू झाला. १९९५ मध्ये झालेल्या पहिल्या विधानसभा निवडणुकीत शेतकरी आणि भाजीपाला विक्रेत्यांच्या मदतीने ते निवडून आले. त्यांनी जनतेच्या मदतीने केवळ ५० हजार रुपयांचा निधी उभा करून ऐतिहासिक विजय प्राप्त केला. नावातच जय आहे, हे लक्षात घेतल्यास, त्यांच्या यशाची गोष्ट



केवळ राजकीय नाही, तर सामाजिक देखील आहे.

त्यांचे कार्यक्षेत्र विस्तृत आहे. शेतकऱ्यांच्या समस्यांवर तोडगा काढणे, रस्त्यांच्या बाबतीत प्रत्यक्ष भेट देऊन समस्या सोडवून देणे, आणि प्रचंड प्रभावशाली नेतृत्व दाखवणे हे त्यांच्या प्रमुख गुण आहेत. त्यांच्या राजकीय आणि सामाजिक कार्याला वाव देताना, ते कधीही आपल्या कार्यकर्त्यांना आणि जनतेला वचन देण्याची किमान चुकतात. तथापि, त्यांचा अधिकारी वर्गावर दबदबा कायम आहे. बालेवाडीतील एका गरीब तरुणाच्या मुद्द्याबद्दल, त्याने एक अधिकारी परत पैसे आणि चुकलेली गोष्ट कबूल केली. यामुळे, राजकारणातील अधिकारी वर्गदेखील त्यांना मान देतात, कारण त्यांचा कार्यशक्तीला कोणतीही शंका नाही.त्यांची निवडणी आणि ताकद पहाता, आगामी राजकीय भविष्य साकारण्यासाठी एक अत्यंत महत्त्वपूर्ण भूमिका त्यांनी घेतली आहे. यासाठी त्यांच्या कट्टर समर्थकांची एक मोठी फौज कायम आहे, आणि जगताप यांच्यावर विश्वास ठेवून कार्यकर्ते त्यांना भेटायला येतात.

# गंगाखेड तालुका समस्यांनी वेढला, प्रशासन आणि पुढाऱ्यांच्या अनास्थेने नागरिक त्रस्त

**गंगाखेड । सिधोधन भालेराव**

गंगाखेड शहर, परभणी जिल्ह्यातील एक प्रमुख आणि ऐतिहासिक शहर म्हणून ओळखले जाते. संत जनाबाईंच्या जन्मभूमीचं स्थान, पवित्र गोदावरी नदीचं पात्र असलेली ही भूमी आहे. तथापि, गंगाखेड तालुका प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे सध्या गंभीर समस्यांना सामोरे जात आहे.

मागील २०२१ पासून गंगाखेड नगरपरिषद आणि पंचायत समितीच्या कारभाराचा भार प्रशासकांकडे असताना, शहरी परिस्थिती काही सुधारली नाही. तुंबलेले नाले, आठ दिवसांनी सुटणारे अस्वच्छ पाणी, आणि वाढलेले अवैध अतिक्रमण यामुळे गंगाखेड शहराचा चेहरा विद्रूप झाला आहे. शहराच्या चेहऱ्यावर सरकारी धोरणांची आणि प्रशासनाची दुर्लक्षता दिसून येते.

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकारी वर्गांच्या तक्रारीत दिलेल्या रकमा अद्याप पूर्णपणे कामाच्या प्रगतीशी संबंधित नाहीत. खरेतर, काही रस्त्यांच्या कामांसाठी ठेकेदारांबद्दल प्रश्न उभे राहिले आहेत. मुख्यमंत्री ग्राम सडक योजना अंतर्गत अनेक रस्त्यांचे काम अद्याप अपूर्ण आहे. गंगाखेडच्या सरकारी सेवा आणि सार्वजनिक कार्यांमध्ये अनेक समस्यांमुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. त्यातच नगर परिषद आणि पंचायत समिती प्रशासनामध्येही मर्जीतील कार्यकर्त्यांची वर्चस्वशाही सुरू आहे. अन्यथा, स्थानिक नागरिक असंतुष्ट होऊन वेगवेगळ्या माध्यमातून यावर भूमिका मांडण्याचा इशारा देत आहेत.उप जिल्हा रुग्णालयात देखील सेवा देण्यात निष्काळजीपणा दिसतो. बस स्थानकाच्या कामाची संथ गती प्रवासी वर्गाला त्रास देत आहे, तर शालेय व्यवस्थेतील दुर्लक्ष नागरिकांमध्ये असंतोष निर्माण करत आहे. त्याचबरोबर, न्याय व्यवस्थेच्या कार्यालयातही ५०० रुपयांच्या बाँडवर ५० रुपयांचा अतिरिक्त शुल्क घेतला जात असल्याचे दिसते. हा मुद्दा सामान्य नागरिकांमध्ये रोष निर्माण करत आहे. या सर्व परिस्थितीमुळे गंगाखेड तालुका कधी योग्य मार्गावर येईल, ह्या बाबतीत नागरिकांमध्ये शंका व्यक्त केली जात आहे.



# आमदार किशोर जोरगेवार यांच्या पुढाकारातून आयोजित सांस्कृतिक कार्यक्रमाला घुग्घूस वासीयांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

## सैराट फेम रिंकू राजगुरू (आर्ची) ठरली आकर्षण,५० नृत्य समूहांचा सहभाग



**चंद्रपूर । प्रतिनिधी**

आमदार किशोर जोरगेवार यांच्या पुढाकारातून भारतीय जनता पक्षाच्या महिला आघाडीच्या वतीने शनिवारी घुग्घूस येथील स्नेहप्रभा मंगल कार्यालयात उत्सव नारिशक्तीचा या कार्यक्रमाचे भव्य आयोजन करण्यात आले होते. सैराट फेम अभिनेत्री रिंकू राजगुरू (आर्ची) यांची उपस्थिती या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरली. घुग्घूस वासियांनी या कार्यक्रमाला भरघोस प्रतिसाद दिला.

या कार्यक्रमात विविध सांस्कृतिक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. एकल नृत्य, युगल नृत्य आणि समूह नृत्य स्पर्धेत ५० हून अधिक गटांनी सहभाग घेतला होता. स्पर्धेतील सादरीकरणांनी उपस्थित प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. सैराट फेम रिंकू राजगुरू हिच्या उपस्थितीमुळे संपूर्ण वातावरण अधिक रंगतदार झाले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी दीपप्रज्वलन करून मान्यवरांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. यावेळी आमदार किशोर जोरगेवार, कल्याणी किशोर जोरगेवार, विवेक बोडे, नितू चौधरी, सुचिता लुटे, शारदा दुर्गम, वैशाली ढवस, सुषमा सावे, कुसुम सातपुते, नंदा कांबळे, उषा आगदारी, नितू जयस्वाल, उज्वला उईके, वनिता निहाल, किरण बोंढे, निरीक्षण तांड्रा, संतोष नुने, संजय तिवारी, राजकुमार गोडशेलवाल, साजन गोहणे, सीनू इसारप, इमरान खान, स्वप्निल वाढई, मुन्ना लोढे, सुरज मोरपाका, अनिल बाम, राजेश मोरपाका, मयूर कलवल, सुनिता घिवे, जयश्री राजूरकर सिनल भरडकर आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाला संबोधित करताना आमदार किशोर जोरगेवार म्हणाले की, महिला सबलीकरण हे समाजाच्या प्रगतीसाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. महिलांना संधी मिळाल्यास त्या कोणत्याही क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करू शकतात. आजच्या या कार्यक्रमातून घुग्घूस शहरातील महिला कलावंतांना आपल्या कलागुणांचे सादरीकरण करण्यासाठी मोठे व्यासपीठ मिळाले आहे. महिलांनी आत्मनिर्भर होण्यासाठी शिक्षण, कला आणि सामाजिक कार्य यामध्ये पुढाकार घ्यावा. अशा प्रकारच्या सांस्कृतिक उपक्रमांमुळे समाजात सकारात्मक बदल घडतात. भविष्यातही अशाच प्रकारचे उपक्रम राबवून महिलांना संधी उपलब्ध करून दिली जाईल असे ते यावेळी म्हणाले.समोर सैराट फेम रिंगू राजगुरू (आर्ची) या उत्तम अभिनेत्री आज उपस्थित आहेत. तिच्या संघर्षमय प्रवासातून आणि अभिनय कारकिर्दीतून तरुणींना प्रेरणा मिळेल. महिलांनी आत्मनिर्भर व्हावे, कला, शिक्षण आणि सामाजिक क्षेत्रात पुढे जावे, हीच या कार्यक्रमामागची संकल्पना आहे. या भागातील विकासकामांबरोबरच महिला शक्तीला प्रोत्साहित करणारे कार्यक्रम पूढेही आयोजित करणार असल्याचे यावेळी आमदार किशोर जोरगेवार यांनी सांगितले.घूग्घूस वासीयांचा मिळालेला प्रतिसाद आजिवन स्मरणात राहिल. आमदार किशोर जोरगेवार यांनी अशा आयोजनातून महिलांना संधी उपलब्ध करुन दिली आहे. आपल्या शहरात आल्यावर उर्जावान घूग्घूसवासी पाहून आनंद झाला. आयोजन उत्तम असून आपल्या उपस्थितीने त्याची भव्यता आणखी वाढल्याचे यावेळी रिंगु राजपूत यांनी सांगीतले. यात एकल स्पर्धेत प्रिती झाडे, युगल नृत्य स्पर्धेत शोभा आणि विभा, तर सामुहिक नृत्य स्पर्धेत शेणगाव येथील नचले गृपने प्रथम पारितोषिक पटकावले. कार्यक्रम पाहण्यासाठी घुग्घूस वासीयांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शविली होती.

# डाळिंब शेतीतील मार्गदर्शक बाबासाहेब गोरे यांना राज्यस्तरीय जीवनगौरव पुरस्कार

### डाळिंब शेतीत संशोधन आणि नवकल्पना

**बाबासाहेब गोरे यांनी डाळिंब शेतीत संशोधन करून अत्याधुनिक पद्धतींचा वापर सुरू केला. बेडवर डाळिंब लागवडीचे जनक म्हणून त्यांची ओळख आहे.डाळिंब झाडांसाठी एकच खोड ठेवण्याचा प्रयोग त्यांनी प्रथम केला.**

**मायक्रोन्यूट्रिएंट स्लरी फॉर्म्युला (अवेना न्यूट्रीमिक्स) विकसित केला, ज्यामुळे शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च कमी झाला.**

**सरकी पेंड स्लरीचा फंडा विकसित करून प्रति एकर उत्पादन वाढवले आणि फळाचा रंग व चमक सुधारली.**

### पुरस्कार आणि मान्यता

**बाबासाहेब गोरे यांच्या कृषी क्षेत्रातील योगदानाची दखल घेऊन राष्ट्रीय व राज्यस्तरीय पुरस्कारांनी त्यांचा गौरव करण्यात आला आहे.**

**२०१५– डाळिंब रत्न पुरस्कार (अखिल महाराष्ट्र डाळिंब संशोधन संघ, पुणे) ४०व्या वर्षी जीवनगौरव पुरस्कार (राष्ट्रीय केमिकल्स आणि फर्टीलायझर्स)**

**२०१७ – सर्वोत्कृष्ट कृषी उद्योजक (राष्ट्रीय कृषी विस्तार व्यवस्थापन संस्था, हैदराबाद)**

**२०२२ – ॲग्री आयडॉल पुरस्कार (महात्मा फुले कृषी विद्यापीठ)**

**२०२३ – शिवपुत्र महाराष्ट्र पुरस्कार (शिवपुत्र छत्रपती संभाजीराजे बहुउद्देशीय संस्था, नाशिक)**

**वैजापूर । प्रतिनिधी**

डाळिंब शेतीत नवे तंत्रज्ञान रुजवून आधुनिक आणि शाश्वत शेतीचा आदर्श घडवणारे बाबासाहेब तुकाराम गोरे यांना राज्यस्तरीय जीवनगौरव पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे. ९ फेब्रुवारी रोजी हा सन्मान त्यांना प्रदान करण्यात येणार आहे.



अहमदनगर जिल्ह्यातील राजुरी या छोट्या गावात जन्मलेल्या बाबासाहेब गोरे यांनी आपल्या गावातच प्राथमिक शिक्षण पूर्ण केले. त्यांनी पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला येथे कीटकशास्त्रात पदव्युत्तर शिक्षण घेतले. वडील शेतकरी असले तरी त्यांनी आपल्या मुलाने नोकरी करावी अशी इच्छा व्यक्त केली होती.

नोकरीच्या निमित्ताने बाबासाहेब गोरे यांनी भारतासह परदेशातही काम केले, मात्र शेतीतच त्यांचे मन रमले. २००७ मध्ये नोकरी सोडून त्यांनी शेती करण्याचा निर्णय घेतला. वडिलांना डाळिंब विकताना अत्यल्प दर मिळाल्याने त्यांच्या डोळ्यांत आलेले अश्रू पाहून, शेतीतच नवा मार्ग शोधण्याचा त्यांनी निश्चय केला.बाबासाहेब गोरे यांनी स्वतःच्या यशापुरते मर्यादित न राहता शेतकऱ्यांसाठी मार्गदर्शन आणि प्रशिक्षण कार्य सुरू केलेमहाराष्ट्र शासनाच्या मॅग्नेट प्रकल्पांतर्गत ते शेतकऱ्यांना आधुनिक शेतीचे प्रशिक्षण देत आहेत. याशिवाय, ऑनलाईन कोर्स आणि प्रशिक्षण व्हिडिओद्वारे हजारो शेतकऱ्यांना शेतीविषयक मार्गदर्शन मिळत आहे.डाळिंब शेतीतील नवकल्पना आणि संशोधनाच्या जोरावर बाबासाहेब गोरे यांनी आधुनिक शेतीचे नवे मार्ग खुले केले आहेत. त्यांच्या या योगदानाची दखल घेत पत्रकार संघातर्फे त्यांना राज्यस्तरीय जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. ९ फेब्रुवारी रोजी त्यांना हा सन्मान प्रदान केला जाणार असून, हा क्षण शेतकरी व कृषी क्षेत्रासाठी अभिमानाचा ठरणार आहे.

# कृषी महाविद्यालयाच्या मुलींनी साकारलेले टेरेस गार्डन



**सोलापूर । प्रतिनिधी**

डॉ. शरदचंद्र पवार कृषी महाविद्यालय, बारामती यांच्या वतीने कृषी कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत मौजे दहिगाव, ता. माळशिरस येथे शाश्वत राहणीमान आणि शहरी बागकामाला प्रोत्साहन देण्यासाठी टेरेस गार्डनवर प्रात्यक्षिक आयोजित केले.

या कार्यक्रमाचा उद्देश सहभागी लोकांना लहान जागेमध्ये स्वतःचे अन्न वाढवण्याचे फायदे आणि तंत्रज्ञान शिकवणे होता. प्रा. गणेश शिंदे सर यांच्या नेतृत्वाखाली, पुनर्नविकरण केलेले साहित्य आणि सेंद्रिय खते वापरून समृद्ध बाग कशी तयार करायची, याचे प्रात्यक्षिक कृषी कन्या कु. समृद्धी बोडके, मिनल माने, राजश्री सूर्यवंशी, संचिता डोंबाळे, दमयंती वनवे, मधुरा कोंडे, शितल शिंदे यांनी करून दाखवले.यावेळी कु. मिनल माने म्हणाल्या, आम्हाला लोकांना दाखवायचं होतं की, बागकाम हा केवळ छंद नसून शाश्वत भविष्यासाठी योगदान देण्याचा मार्ग आहे. टेरेस गार्डनमुळे कोणालाही स्वतःचे अन्न वाढवता येणे शक्य आहे. निसर्गाशी असलेली नाळ जपण्याचा एक प्रयत्न यशस्वी होऊ शकतो आणि त्यातून आपला आर्थिक फायदा देखील होऊ शकतो.या उपक्रमासाठी स्थानिक रहिवाशांनी चांगली उपस्थिती दाखवली आणि त्यांनी या उपक्रमाचे खूप कौतुक केले.

# रघुनंदन गिरी महाराज यांच्या तप्पूर्ती सोहळ्यात ह.भ.प.गोपाळ नंदगिरीजी महाराज यांची सेवा संपन्न



**गंगापूर । प्रतिनिधी**

गंगापूर तालुक्यातील झोडेगाव येथील रघुनंदन गिरी महाराज यांच्या तप्पूर्ती सोहळ्याला ३० जानेवारीला प्रारंभ झाला. तिसऱ्या दिवशी ह.भ.प. गोपाळ नंदगिरीजी महाराज यांची सेवा संपन्न झाली, ज्यामुळे गाववासीयांसाठी एक अनमोल आणि अभूतपूर्व अनुभव झाला. सोहळ्याला भाग घेण्यासाठी झोडेगाव आणि पंचक्रोशीतील भाविकांची अलोट गर्दी जमली होती. सोहळ्याच्या यशस्वी आयोजनासाठी ग्रामपंचायत आणि इतर स्थानिक संस्थांनी महत्वपूर्ण सहकार्य दिले. या सोहळ्यात संभाजीनगर, अहिल्यानगर तसेच इतर जिल्ह्यातूनही मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते.भाविकांचे उत्साही वातावरण आणि प्रचंड सहभाग पाहता, या तपपूर्ती सोहळ्याला अपार लोकप्रियता मिळाली आहे. झोडेगाव गावाची यामुळे महत्त्वपूर्ण ओळख झाली आहे, आणि सोहळ्याच्या आयोजनामुळे गावाची प्रतिष्ठा अधिकच वाढली आहे.

# पत्रकार सेवा संघातर्फे भूषण बेडवाल यांना राज्यस्तरीय लोकसेवा पुरस्कारासाठी निवड

**गंगापूर । प्रतिनिधी**

गंगापूर तालुक्यातील खडक वाघलगाव येथील भूषण बेडवाल यांना त्यांच्या असामान्य सामाजिक कार्यासाठी राज्यस्तरीय लोकसेवा जीवनगौरव पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे.

भूषण बेडवाल हे जिल्हा मध्यवर्ती सहकारी सोसायटीचे दहा वर्षांपासून चेअरमन आहेत. त्यांनी शेतकऱ्यांना कृषी कर्जासाठी पाठपुरावा करून कर्ज मिळवून दिले. तसेच गरीब कुटुंबांना मुख्यमंत्री सहायता निधीतून सहकार्य करत, त्यांच्या जीवनात



सकारात्मक बदल घडवले आहेत. सध्या ते झोडेगाव - खडक वाघलगाव ग्रामपंचायतीचे सदस्य म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या कार्याची दखल घेत, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाने ९ फेब्रुवारी रोजी लासूर येथे होणाऱ्या जीवन गौरव सोहळ्यात त्यांना राज्यस्तरीय लोकसेवा जीवनगौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्याचा निर्णय घेतला आहे.

भूषण बेडवाल यांचा हा सन्मान त्यांच्या समर्पणशीलतेचे, कष्ट आणि जनसेवा याचे प्रतीक आहे. त्यांच्या कार्यामुळे गावामध्ये आणि परिसरात मोठ्या प्रमाणात परिवर्तन घडले आहे. या पुरस्कारामुळे भूषण बेडवाल यांचे कार्य आणखी मोठ्या प्रमाणात समाजासाठी आदर्श बनले आहे.

# शहाजी दिघे यांच्या नेतृत्वाखाली पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्याची माहिती युवापिढीला दिशादर्शक ठरेल–प्रा.राम शिंदे

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंती वर्षानिमित्त सांस्कृतिक कार्य विभागातर्फे तयार करण्यात आलेल्या चित्ररथाच्या उद्घाटनप्रसंगी विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी अहमदनगर जिल्ह्यातील युवापिढीला पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्याची माहिती दिली आणि ती युवापिढीला दिशादर्शक ठरेल, असा विश्वास व्यक्त केला. या चित्ररथात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिकूल परिस्थितीवर मात करत केलेल्या कार्याची माहिती दिली जात आहे. त्यांच्या शौर्याचे आणि कार्याच्या महानतेचे चित्रण करणाऱ्या या चित्ररथाचे उद्घाटन प्रा. राम शिंदे आणि सांस्कृतिक कार्य मंत्री ड. आशिष शेलार यांच्या प्रमुख उपस्थितीत (दूरदृष्य प्रणालीद्वारे) करण्यात आले.

अहिल्यानगर पोलीस परेड ग्राऊंड येथे आयोजित कार्यक्रमात जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ, अतिरिक्त पोलीस अधीक्षक प्रशांत खैरे, सांस्कृतिक कार्य विभागाचे सह संचालक राम पांडे, पोलीस निरीक्षक उमेश परदेशी आणि महेंद्र गंधे यांची उपस्थिती होती.

प्रा. राम शिंदे यांनी आपल्या भाषणात सांगितले की, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी त्यांच्या कार्यकाळात शोषित, पीडित आणि वंचित समाजाला न्याय दिला. तसेच, अनेक धार्मिक स्थळांचे जीर्णोद्धार,



जलसंवर्धन आणि समाजातील अपप्रवृत्तीला आळा घालण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. या कार्याच्या ३०० व्या जयंतीनिमित्त राज्यभर विविध कार्यक्रम आयोजित केले जात आहेत. अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्याची माहिती युवापिढीपर्यंत पोहचवण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात अशा प्रकारच्या चित्ररथाचे आयोजन केले जाणार आहे, असे त्यांनी सांगितले. मंत्री ड. आशिष शेलार यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांना धर्मपरायणता, दानशूरपणा आणि मानवतावादाचे आदर्श मानले. त्यांचे कार्य, जसे की कृषी कर पद्धतीमध्ये सुधारणा, महिलांना हक्क देणे, वस्त्रोद्योगास चालना देणे आणि आर्थिक सुधारणा, हे सर्व इतिहासात अजरामर झाले आहे. अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्याची माहिती जनमानसापर्यंत पोहोचवण्यासाठी चित्ररथ तयार करण्यात आल्याचे सांगत मंत्री शेलार यांनी असेही सांगितले की, राज्यभर विविध जिल्ह्यांमध्ये गुणवत्तापूर्ण कार्यक्रम आयोजित केले जात आहेत. त्याच्या माध्यमातून त्यांच्या कार्याची माहिती जनतेपर्यंत पोहचवण्याचा उद्देश आहे. कार्यक्रमाच्या दरम्यान, जिल्हाधिकारी सालीमठ यांनी अहमदनगर जिल्ह्यातील ३०० तलाव गाळमुक्त करण्याच्या प्रयत्नाचा उल्लेख केला आणि चित्ररथाच्या माध्यमातून ग्रामीण जनतेला अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्याची माहिती पोहोचविण्याचा महत्त्वपूर्ण कार्य होईल, असे सांगितले. कार्यक्रमाच्या प्रारंभात सह संचालक राम पांडे यांनी चित्ररथाचे वर्णन केले.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .

# पत्रकारांच्या प्रश्नासाठी रस्त्यावर उतरून आंदोलन करणार

## मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख यांचा इशारा : सेलूत राज्यस्तरीय पत्रकार मेळावा

**परभणी | लक्ष्मण उजगरे**

पत्रकारांच्या प्रश्नासाठी मराठी पत्रकार परिषदेने सातत्याने पाठपुरावा केला आहे. पत्रकारांच्या संरक्षणासाठी कायदा व्हावा, यासाठी रस्त्यावर उतरून आंदोलने केली होती. अखेर २०१७ मध्ये सरकारने पत्रकार संरक्षण कायदा केला, पण प्रत्यक्षात या कायद्याची अंमलबजावणी होत नाही कारण नोटिफिकेशन अजूनही निघाले नाही. सरकार पत्रकारांच्या इतर प्रश्नांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत आहे. त्यामुळे पत्रकारांच्या विविध प्रश्नांसाठी परिषदेच्यावतीने राज्यभर रस्त्यावर उतरून आंदोलन करण्यात येईल, असा इशारा मराठी पत्रकार परिषदेमध्ये मुख्य विश्वस्त एस. एम. देशमुख यांनी दिला.




मराठी पत्रकार परिषद आयोजित रंगाअण्णा वैद्य आदर्श जिल्हा व वसंतराव काणे आदर्श तालुका पत्रकार संघ पुरस्कार वितरण सोहळा व अध्यक्षांचा मेळावा परभणी जिल्ह्यातील सेलू येथे एस. एम. देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात पार पडला. यावेळी देशमुख बोलत होते. याप्रसंगी परिषदेचे विश्वस्त किरण नाईक, शरद पाबळे, अध्यक्ष मिलिंद अष्टीवकर, प्रमुख वक्ते तथा प्रसिद्ध निवेदक विशाल परदेशी, स्वागताध्यक्ष विनोद बोराडे, कार्याध्यक्ष शिवराज काटकर, सरचिटणीस प्रा. सुरेश नाईकवाडे, कोषाध्यक्ष मन्सूर शेख, राज्य प्रसिद्धीप्रमुख संदीप कुलकर्णी, सह प्रसिद्धीप्रमुख भरत निगडे, महिला आघाडी अध्यक्षा शोभाताई जयपूरकर, डिझिटल मीडिया प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे, उपाध्यक्ष प्रकाश कांबळे, विभागीय सचिव रवी उबाळे, सचिन शिवशेट्टे, अशोक काकडे, उप विभागीय अधिकारी संगीता सानप, माजी नगराध्यक्ष हेमंत आढळकर, जिल्हाध्यक्ष प्रभू दिपके, जिल्हा सरचिटणीस मोहम्मद इलियास, सेलू तालुका पत्रकार संघ अध्यक्ष लक्ष्मण बागुल यांच्यासह राज्याच्या विविध भागातून आलेले पत्रकार उपस्थित होते.देशमुख यांनी सांगितले की, राज्य सरकारने पत्रकारांसाठी पेन्शन योजना, आरोग्य योजना सुरू केल्या असल्या तरी प्रत्यक्षात या योजनांचा लाभ घेताना अनेक अडचणी येत आहेत. समाजाच्या पत्रकारांकडून १०० अपेक्षा करतो, पण अडचणीच्या वेळात समाज पत्रकारांच्या पाठीशी उभा राहतो का, हे महत्त्वाचे आहे. यापुढे महाराष्ट्रातील एकही पत्रकार एकाकी पडणार नाही, यासाठी मराठी पत्रकार परिषद काम करीत आहे. पत्रकारिता क्षेत्रातील तणाव आणि आव्हानांना सामोरे जात असताना परिषद ग्रामीण भागातील पत्रकारांच्या हक्कांच्या चळवळीला आणखी जोमाने पुढे घेऊन जाण्याचा निर्धार घेत आहे.

कार्यक्रमाच्या प्रसंगी, विशाल परदेशी यांनी पत्रकारिता क्षेत्रात काम करताना माणसे जोडण्याचा सल्ला दिला आणि पत्रकारांना आत्मसुरक्षेच्या बाबतीत साक्षेपने विचार करण्याचे आवाहन केले.कार्यक्रमामध्ये महाराष्ट्रातील विविध भागातील पत्रकार संघांना पुरस्कार देण्यात आले. यामध्ये अकोला, कणकवली, बुटीबोरी, सेलू, पिंपरी चिंचवड, शहादा, उमरगा, खामगाव आणि चिपळूण तालुका पत्रकार संघांचा गौरव करण्यात आला. तसेच, डी व्ही मुळे (ज्येष्ठ पत्रकार) आणि कांचनजी कोरडे (ज्येष्ठ पत्रकार) यांचा पत्रकारितेतील विशेष योगदानाबद्दल गौरव करण्यात आला.

# सोनालीका ट्रॅक्टर डीलर कडून शेतकऱ्याची फसवणूक,पत्रकाराला अपशब्द वापरण्याचा आरोप

### शेतकऱ्याची फसवणूक आणि पोलिसांचा निष्काळजीपणा

**सोनालीका ट्रॅक्टर डीलरकडून शेतकऱ्याला एल. इ. डी. टीव्ही देण्याचे आश्वासन दिले गेले, मात्र ट्रॅक्टर खरेदी केल्यानंतर ते देण्यात आले नाही. यावर शेतकऱ्याने संबंधित एजंट आणि डीलरला संपर्क साधला, परंतु त्यांना उडवाउडवीची उत्तरे दिली गेली. शेतकऱ्याने गंगापूर पोलिस ठाण्यात तक्रार केली असता, पि. एस. ओ असलेल्या अवधूत यांनी अर्जाची पोहच पावती देण्यास नकार दिला. पोलिसांचा निष्काळजीपणा आणि फसवणुकीच्या प्रकरणात योग्य कारवाई न केल्याने सामान्य शेतकऱ्यांवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.**


### पत्रकारावर अपशब्द आणि कारवाईची मागणी

**पत्रकाराने या प्रकरणाची माहिती घेण्यासाठी गंगापूर पोलिस ठाण्याला संपर्क साधला असता, संबंधित व्यक्तीने पत्रकाराला कॉल करून त्याला अपशब्द वापरले. पत्रकाराच्या भावना दुखावल्या गेल्या असून, शेतकऱ्यांच्या हक्कांसाठी आवाज उठवणाऱ्या पत्रकारांवर असं लक्ष ठेवणारी कारवाई केली जावी, अशी मागणी करण्यात आली आहे.**

**गंगापूर | प्रतिनिधी**

गंगापूर तालुक्यातील झोडेगाव येथील शेतकऱ्याला सोनालीका ट्रॅक्टर डीलरकडून फसवणूक करण्यात आली आहे. १२ डिसेंबर २०२३ रोजी ट्रॅक्टर खरेदी करताना, शेतकऱ्याला एल. इडी. टीव्ही मोफत देण्याचे आश्वासन देण्यात आले होते, मात्र ट्रॅक्टर खरेदी केल्यानंतर एल. इडी. टीव्ही शेतकऱ्याला न मिळाल्याने त्याने एजंट आणि संबंधित व्यक्तींना संपर्क साधला.

दिगंबर पवार आणि सुभाष सोनवणे यांनी ट्रॅक्टर बुकिंगसाठी शेतकऱ्याला २०,००० रुपये घेतले होते, पण वेळोवेळी एल. इडी. टीव्ही दिला गेला नाही. शेतकऱ्याने पुन्हा एकदा या संदर्भात संपर्क साधला असता, तेव्हा त्याला उडवाउडवीची उत्तरे मिळाली. पोलिस चौकीत जाण्याचा प्रयत्न केला असता, उपनिरीक्षक झोरे यांनी संबंधित कंपनीकडून येईल असे सांगितले, पण शेतकऱ्याला तुम्ही पोलीस चौकीत गेला



आहेत, तर तुम्हाला काय करता येईल ते करा असे सांगण्यात आले.

यावर गंगापूर पोलीस ठाण्यात कारवाईची मागणी केली असता, पि. एस. ओ असलेल्या अवधूत या कर्मचाऱ्यांनी अर्जाची पोहच पावती देण्यास नकार दिला. यामुळे सामान्य शेतकऱ्याला न्याय मिळवण्याच्या बाबतीत पोलिसांवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

# जव्हार आगारात दहा एसटी गाड्या दाखल



**जव्हार | जितेंद्र मोरघा**

ग्रामीण भागाची जीवनवाहिनी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या जव्हार आगारात अशोक लेलैंड कंपनीच्या दहा नव्या गाड्या दाखल झाल्या आहेत. ४१ प्रवाशांची बस क्षमता असलेल्या या नव्या गाड्या अनेक वर्षांनी जव्हार आगारात प्राप्त झाल्याने आता ग्रामीण भागातील प्रवाशांना सुखकारक प्रवास आणि वेळेवर बस सेवा उपलब्ध होईल, अशी आशा व्यक्त केली जात आहे.

गाव तेथे एसटी या एसटीच्या ब्रीद वाक्याचे पालन करत, ग्रामीण भागातील नागरिकांना तालुक्याच्या ठिकाणी ये-जा करण्यासाठी एसटीवरच अवलंबून राहावे लागते. त्यामुळे एसटी ही ग्रामीण आणि शहरी भागाला जोडणारी महत्त्वाची वाहतूक साधन बनली आहे. या नव्या गाड्या परिसरातील प्रवाशांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरतील, अशी अपेक्षा आहे.

# देगांव सह परिसरात बिबट्याचा धुमाकूळ, गावातील नागरिक भयभीत-वन विभागाचे दुर्लक्ष

**धुळे | प्रतिनिधी**

साक्री तालुक्यातील पिंपळनेर वनपरिक्षेत्र हद्दीतील देगांव गावात बिबट्या मादीसह तीन बछड्यांचा गावात धुमाकूळ सुरू आहे. वन विभागाला निवेदन देऊनही ठोस पावले उचलली जात नाहीत. गेल्या महिन्याभरापासून वन विभागाला बिबट्याचा गावात मुक्त संचार असल्याची माहिती देऊनही, वन विभागाने ट्रॅप कॅमेरा लावला परंतु, त्यात बिबट्या कैद झाल्याची कोणतीही माहिती मिळाली नाही. दिघावे परिमंडळातील वनपाल चौरे बापूंनी याबद्दल माहिती दिली. ट्रॅप कॅमेरा लावण्यासाठी अनिल घरटे, बागुल दादा, रंजना पावरा व शेतकरी राजेंद्र देसले, मुकेश खैरनार, विष्णू सोनवणे, महेंद्र बागुल, उमाकांत अहिरराव हे सर्व उपस्थित होते. सध्या रब्बी हंगाम सुरू असताना कांदा,



गहू, हरभरा या पिकांना पाणी देताना शेतकऱ्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. रात्रीचा वीज पुरवठा होत असल्याने शेतकऱ्यांना जीव मुठीत घेऊन शेतात पाणी देण्यासाठी जावे लागते, परंतु वन विभागातील अधिकारी व कर्मचारी बिबट्याच्या वावराबाबत दुर्लक्ष करत असल्याचा आरोप शेतकऱ्यांकडून होत आहे.शेतकऱ्यांनी तात्काळ बिबट्या मादीचा व तिच्या बछड्यांचा बंदोबस्त करण्याची मागणी केली आहे. अन्यथा, त्यांच्या जीविताचा नुकसान झाल्यास याला जबाबदार पिंपळनेर वनपरिक्षेत्रातील अधिकारी असतील, अशी चेतावणी त्यांनी दिली.

# करमाळा शहराच्या विकासासाठी २१ कोटी ७५ लाख रुपयांच्या प्रस्तावाला एकनाथ शिंदे यांचे मंजुरी आदेश

**सोलापूर | प्रतिनिधी**

करमाळा शहराच्या सर्वांगीण विकासासाठी २१ कोटी ७५ लाख रुपयांचा प्रस्ताव तयार करून जिल्हाप्रमुख महेश चिवटे यांनी नगर विकास मंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे सादर केला. यामध्ये शहरातील प्रमुख रस्त्यांचे सुशोभीकरण, रोड डिव्हायडर्स, स्ट्रीट लाइट्सची व्यवस्था, वृक्षारोपण आणि अन्य सुविधांचा समावेश करण्यात आला आहे.

मुंबईतील नंदन बंगल्यावर जिल्हाप्रमुख चिवटे यांनी एकनाथ शिंदे यांची भेट घेत प्रस्ताव सादर केला. यामध्ये श्रावण नगर, गणेश नगर, मुथा नगर येथील प्रमुख रस्त्यांचे सुशोभीकरण, नगरपालिकेच्या ओपन स्पेसमध्ये वृक्षारोपण, तसेच करमाळा शहर ते देवीचा माळ रोड सुशोभीकरण यांसारख्या योजना समाविष्ट आहेत.



नगर विकास मंत्री एकनाथ शिंदे यांनी यावर तात्काळ स्वाक्षरी केली असून, प्रस्तावावर पुढील कार्यवाहीसाठी आदेश दिले. तसेच, सुधारित पाणीपुरवठा योजना 'अमृत टू', जलशुद्धीकरण प्रकल्प आणि भयारी गटार योजना या ३२० कोटी रुपयांच्या प्रस्तावांसाठीही कागदपत्रातील त्रुटी दूर करून कामे जलद गतीने पूर्ण करण्याचे आदेश नगर विकास सचिव सचिन सहस्त्रबुद्धे यांना दिले आहेत.

# कोलकत्त्यात प्राचार्य बाळासाहेब नरारे गुरु आचार्य पुरस्काराने सन्मानित

**सोलापूर | प्रतिनिधी**

इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट फॉर कॉम्प्लिमेंटरी अँड अल्टरनेटिव्ह थेरपी, कोलकत्ताच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या आंतरराष्ट्रीय संगीत परिषद आणि दीक्षांत समारंभात सुरताल संगीत विद्यालयाचे प्राचार्य बाळासाहेब नरारे यांना प्रतिष्ठित गुरु आचार्य पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. या पुरस्काराचे वितरण मिडिया प्रोड्युसर डॉ. गोपालेश्वर मुखर्जी, रायटर आणि डायरेक्टर उपेंद्र शर्मा, तसेच कथक नृत्यांगना डॉ. अर्पिता चटर्जी यांच्या हस्ते करण्यात आले.

या आंतरराष्ट्रीय संगीत परिषद आणि दीक्षांत समारंभात भारतभरातून संगीत तज्ज्ञांना आमंत्रित करण्यात आले होते. संगीत आणि योग क्षेत्रात ३० वर्षांचा अनुभव असलेल्या प्राचार्य बाळासाहेब



नरारे यांनी संगीत आणि योगाचा प्रचार व प्रसार करण्यासाठी विविध आंतरराष्ट्रीय संगीत महोत्सव, गायन, वादन, नृत्य कार्यशाळांचे आयोजन, तसेच युवा कलाकारांना सन्मानित करणे यासारख्या उपक्रमांत सक्रिय सहभाग घेतला आहे.

त्यांच्या या सातत्यपूर्ण कार्यामुळेच त्यांना गुरु आचार्य पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले आहे.

# रांजणगाव गणपती येथे बेरोजगार तरुणांना ठेकेदार कडून मारहाण,दोन आरोपींना अटक

**शिरूर | रमेश बनसोडे**

पुणे जिल्ह्यातील शिरूर तालुक्यातील रांजणगाव एमआयडीसी येथे बेरोजगार तरुणांना ठेकेदाराकडून मारहाण केली गेली आहे. या प्रकरणी दोन आरोपींना अटक करण्यात आली असून, पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.रांजणगाव एमआयडीसी मध्ये अनेक कंपन्यांमुळे रोजगाराच्या मोठ्या संधी उपलब्ध आहेत. त्यामुळे अनेक युवक-युवती पुणे शहरातून येथे कामासाठी येतात. पण काही वेळा त्यांची फसवणूक होते. नुकतेच येथे वेठबिगारीचे एक प्रकरण समोर आले आहे. फिर्यादी सुधाकर माखणे आणि इतर कामगार एसकेएच कंपनीत काम करण्यासाठी आले होते. आरोपींनी त्यांना डांबून ठेवून धमकावले आणि वेगवेगळ्या कंपन्यांमध्ये काम करण्यास भाग पाडले, तसेच कामाचे पैसे देखील दिले नाहीत. फिर्यादी सुधाकर माखणे यांनी दवाखान्यात जाण्यासाठी पैसे मागितले असता, आरोपींनी फायबर पाईपने त्यांना मारहाण केली. इतर कामगारांनाही वेळोवेळी मारहाण करण्यात आली.रांजणगाव एमआयडीसी पोलिसांनी या प्रकरणी गुन्हा दाखल केला आणि आरोपी आनंद दिगंबर वाघळकर व प्रशांत श्रावण साळवे यांना अटक केली आहे. इतर आरोपींचा शोध सुरु आहे. कलम: बी. एन. एस. (१२६(२), १२७(२)(३)(४) ११८,(१) ११५(२) ३५१(२)(३) ३) वेठबिगार कायदा कलम ४, १६ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी आरोपींना न्यायालयात हजर केले असता, त्यांना ५ फेब्रुवारी २०२५ पर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. पुढील तपास पीएसआय अविनाश थोरात करत आहेत.



# बजेट २०२५ मधील AI धोरण भारताच्या तांत्रिक प्रगतीसाठी महत्त्वपूर्ण-समीर नवाज

**भंडारा | प्रतिनिधी**

समीर वर्ल्ड कंप्यूटर एज्युकेशन, भंडाराचे संचालक समीर नवाज यांनी बजेट २०२५ मध्ये आर्टिफिशियल इंटेलिजन्स (-ख) संदर्भातील तरतुदींवर आपले मत व्यक्त केले आहे. त्यांच्या मते, बजेट २०२५ हे भारताच्या तांत्रिक विकासाच्या दिशेने एक मोठे पाऊल आहे.AI तंत्रज्ञानाचा वापर केवळ सरकारी यंत्रणांपुरता मर्यादित न राहता, तो विविध क्षेत्रांमध्ये क्रांती घडवू शकतो. विशेषतः आयकर विभागात AI चा वापर केल्याने पारदर्शकता आणि कार्यक्षमतेत लक्षणीय वाढ होईल.



समीर नवाज पुढे म्हणतात, AI धोरणामुळे स्टार्टअप्सना प्रोत्साहन मिळेल तसेच लघु-मध्यम उद्योगांनाही नवी दारे खुली होतील. महाराष्ट्र सरकारने जाहीर केलेली AI धोरण २०२५ ही तरुणांसाठी रोजगाराच्या नव्या संधी निर्माण करेल. शिक्षण क्षेत्रातही AI च्या मदतीने डिजिटल शिक्षणाचे दर्जा सुधारेल.त्यांच्या मते, AI ही केवळ एक तांत्रिक प्रगती नसून, भारताच्या आर्थिक विकासाचे इंजिन ठरू शकते. सरकारने या क्षेत्रावर अधिक भर दिल्यास भारत लवकरच जागतिक तंत्रज्ञान क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण करेल.

# बेकायदा शस्त्रे बाळगणारे भरपूर, मात्र जिल्ह्यात फक्त ३६४४ परवानाधारक -गृहविभागाचे नेमकं गौडबंगाल काय?

**सातारा | किरण अडागळे**

अलीकडे शस्त्रांची हौस म्हणून बाळगणाऱ्यांची संख्या वाढत असून, यासाठी शस्त्र परवाना घेणाऱ्यांची संख्या मात्र घटत आहे. २०२१ मध्ये सातारा जिल्ह्यात १०,१९६ शस्त्र परवाना धारक होते, परंतु त्यानंतर तब्बल ६५५२ शस्त्र परवाने कमी झाले आहेत. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या मिळालेल्या माहितीप्रमाणे, गृहविभागाच्या आकडेवारीनुसार सध्या सातारा जिल्ह्यात फक्त ३६४४ शस्त्र परवाना धारक आहेत.

या घटनेवर विचार केल्यास, शस्त्र परवाने कोठे गेले? किंवा काही कारणाने रद्द झाले का? यावर कोणतीही स्पष्टीकरण नाही. सातारा तालुका शस्त्र परवाना बाळगण्यामध्ये सर्वात पुढे असतानाही, खंडाळा व माण तालुक्यातील परवाने सर्वात कमी आहेत. बंदूक वापरण्यासाठी परवानगी मिळवण्याची प्रक्रिया अत्यंत किचकट असताना, काही व्यक्ती हौसेने परवाना मिळवण्यासाठी पुढे येत आहेत. स्वरक्षण आणि शेतीच्या संरक्षणासाठी परवाना मिळवला जातो, परंतु काही जण हौसेने आणि समाजाला दाखवण्यासाठी बंदुका व पिस्तूल वापरत आहेत. शस्त्र परवाना मिळवण्यासाठी प्रस्ताव पोलीस अधिक्षकांकडून मान्य केला जातो, नंतर तो जिल्हाधिकारी कार्यालयात येतो. जिल्हाधिकारी प्रस्तावाची तपासणी करून परवाना मंजूर करतात. गृहविभागाच्या कार्यालयात केवळ ३६४४ शस्त्र परवाना धारकांची नोंद असताना, गेल्या चार वर्षांत शस्त्र परवाना मिळवण्यासाठी संख्येत वाढ झाली आहे. तरीही इतकी कमी नोंद दाखवली जात आहे, यावर गृहविभागाचे नेमके काय उद्दिष्ट आहे, हा प्रश्न अनुत्तरित आहे आणि अत्यंत महत्वाचा आहे.

# शिवराज राक्षेने पंचांवर लाथ हाणल्याचा वाद : ट्रिपल महाराष्ट्र केसरी होण्याच्या शर्यतीत 'षडयंत्र' रचल्याचा आरोप


**अहिल्यानगर । शहाजी दिघे**

६७ व्या महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेत गोंधळ झाला आणि त्यानंतर पैलवान शिवराज राक्षेने पंचांची कॉलर पकडली आणि त्यांना लाथ मारली. राक्षे यांच्यावर आरोप आहे की, पंचांनी त्यांना विनाकारण पराभूत घोषित केले, आणि त्यावर रागाच्या भरात त्यांना शारीरिक हिंसा केली.

राक्षेने आपल्या बाजूने सांगितले की, माझे दोन्ही खांदे आणि पाठ टेकले नव्हते, तरीही मला पराभूत घोषित करण्यात आलं. तो म्हणाला, मी ट्रिपल महाराष्ट्र केसरी होण्याच्या दृष्टीने हा सामना जिंकणार होतो. पण पंचांनी आपल्यावर अन्याय केला आणि निर्णयाच्या रिव्ह्यूची मागणीही नाकारली.

राक्षेचे कोचही पंचांवर आरोप करत आहेत. ते म्हणाले, कुस्तीत खांदे टेकले असते तर शिवराज हारला असता, पण त्या निर्णयावर अपील करणे गरजेचे होते. आम्हाला हा निर्णय मान्य नाही.

शिवराज राक्षेने स्पर्धेच्या निर्णयाच्या रिव्ह्यूची मागणी केली आहे. त्याच्या म्हणण्यानुसार, सामन्याचा व्हिडीओ पाहून निर्णय घ्यावा, जर खांदे टेकले नसतील तर सामना पुन्हा घेतला जाऊ शकतो. स्पर्धेतील वादामुळे पोलिसांनी हस्तक्षेप केला आणि दोन्ही मल्ल उपमुख्यमंत्री अजित पवारांकडे गेले. तज्ज्ञांचे मत आहे की, रिव्ह्यूचा अधिकार प्रत्येक स्पर्धकाला आहे आणि पंचांनी तो मान्य केला पाहिजे. यामध्ये घडलेल्या गोंधळामुळे स्पर्धेचे वातावरण तणावपूर्ण बनले आणि निर्णयाच्या पुनरावलोकनाची आवश्यकता समोर आली आहे.





# रामजी बाबा आंबेडकर यांच्या स्मृती दिना प्रित्यर्थ अभिवादन, जेतवन बुद्ध विहार येथे कार्यक्रम संपन्न

**चिमूर । प्रतिनिधी**

चिमूर तालुक्यातील जेतवन बुद्ध विहार, मालेवाडा येथे दि. २ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता सुभेदार रामजी बाबा आंबेडकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त अभिवादन कार्यक्रम आयोजित करण्यात आला.या कार्यक्रमात बौध्द पंच कमेटीचे अध्यक्ष जगदीश रामटेके, निलकंठ बांबोडे, विजय गजभिये यांच्या हस्ते सुभेदार रामजी बाबा आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून दीपप्रज्वलन करण्यात आले. याप्रसंगी बौध्द पंच कमेटीचे सचिव आशिक रामटेके यांनी सुभेदार रामजी बाबा आंबेडकर यांच्या जीवनावर प्रकाश टाकला.




रामजी बाबा आंबेडकर हे ब्रिटिश भारतीय सैन्यात 'सुभेदार' पदावर कार्यरत होते. इंग्रजी भाषेवर प्रभुत्व असल्यामुळे त्यांनी भारतीय सैन्यांना शिकवण्याचे कार्यही केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे वडील असलेल्या रामजी आंबेडकरांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत भीमरावांचे शिक्षण पूर्ण करण्यासाठी कष्ट घेतले आणि समाजाच्या उन्नतीसाठी त्यांची मदत केली. या कार्यक्रमात शांताराम शेंडे, शैलेश ठवरे आणि शालेय विद्यार्थ्यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रदिप मेश्राम यांनी केले, तर आभार योगेश मेश्राम यांनी मानले.

## नवतळा ग्रामपंचायत दुकान चाळ लगतचे अतिक्रमण हटविण्याची मागणी

# रवींद्र मासुरकर यांच्या तक्रारीकडे प्रशासनाचे दुर्लक्ष

**चिमूर । शेषराव राऊत**

चिमूर तालुक्यात अतिक्रमण हटाव मोहीम बंदोबस्तासह चिमूर व नेरी येथे राबवली जात असताना, नवतळा येथील ग्रामपंचायत चाळ लगत अतिक्रमण करून पक्के बांधकाम सुरू असतानाही प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते रवींद्र मासुरकर यांनी केला आहे. नवतळा येथील मुख्य मार्गावर स्थित ग्रामपंचायत चाळच्या दुकानाच्या जवळ शासकीय जागेवर भास्कर रामटेके यांनी पक्के बांधकाम सुरू केले आहे. या बांधकामासाठी ग्रामपंचायत कडून कोणतीही परवानगी घेतली गेलेली नाही. रवींद्र मासुरकर यांनी यावर २४ जानेवारीला लेखी तक्रार दिली होती, परंतु ग्रामसेवक यांनी या तक्रारीकडे दुर्लक्ष केले आहे. दरम्यान, चिमूर व नेरी येथील प्रशासन आणि पोलिसांनी अनेक वर्षांपासून अतिक्रमण हटवून कडक कारवाई केली असताना, नवतळा ग्रामपंचायतचे सरपंच व सचिव या बाबतीत का दुर्लक्ष करत आहेत, असा सवाल रवींद्र मासुरकर यांनी उपस्थित केला आहे. त्यांनी नवतळा ग्रामपंचायतीच्या जागेवरील अतिक्रमण हटवून त्यावर बांधकाम थांबवण्याची मागणी केली आहे.



# शेतकरी ओळखपत्र काढण्यास शेतकऱ्यांचा उत्सुर्त प्रतिसाद;समीर कॉम्प्युटरचा अभिनव उपक्रम

**भंडारा । प्रतिनिधी**

कृषी क्षेत्राचे डिजिलायझेशन करण्याच्या हेतूने एक मोठे पाऊल म्हणून शेतकऱ्यांना आधार कार्ड प्रमाणे युनिक शेतकरी कार्ड म्हणजेच फार्मर आयडी ही योजना राज्य शासनामार्फत सुरू करण्यात आली आहे. या शेतकरी ओळखपत्राची नोंदणी भंडारा शहरातील समीर वर्ड कॉम्प्युटर एज्युकेशन पोहा गल्ली पंजाबी हॉल समोर उत्साहात सुरू झाली आहे.

या शेतकरी ओळखपत्रामुळे शेतकऱ्यांची डिजिटल ओळख निर्माण होणार आहे. शेतकऱ्यांची संपूर्ण माहिती फार्मर आयडी मध्ये एकत्र केली जाऊन शेतीविषयक कोणत्याही योजनेचा फॉर्म भरतांना सोयीस्कर होणार आहे. भविष्यात येणाऱ्या शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांकडे फार्मर आयडी असणे आवश्यक असणार आहे. थोडक्यात शेतकरी ओळखपत्राच्या माध्यमातून शेती क्षेत्रात प्रगती करण्यासाठी शेतकऱ्यांना याचा फायदा होणार आहे असे प्रतिपादन माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ भंडारा शहर प्रचार प्रमुख तथा आपले सरकार सेवा केंद्राचे संचालक मो. सरफराज नवाज यांनी व्यक्त केले.त्यावेळी समीर वर्ड कॉम्प्युटर एज्युकेशनचे संचालिका फराह शेख, आपले सरकार सेवा केंद्राचे संचालक तथा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ भंडारा शहर प्रचार प्रमुख मो. सरफराज नवाज, सामाजिक कार्यकर्ते विलास केजरकर, दिघोरी ( मोठी) येथील शेतकरी यशवंत बिरे, प्रदीप अले, नासीर शेख, मीहीर सतदेवे, विभांषू तिरपुडे, किर्ती निपाणे, अनिकेत शेंडे यांच्या सह अनेक शेतकरी उपस्थित होते.




# भोर्जे गावाने जपली एक गाव एक उत्सव परंपरा; सोमजाई माता देवस्थानी उत्सवाचा आनंदोत्सव

**रायगड । प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील सुधागड तालुक्यातील भौर्जे गावाने एक गाव, एक उत्सव या परंपरेला कायम ठेवले आहे. अनाठाई खर्च टाळण्यासाठी आणि गावातील भौतिक तसेच अध्यात्मिक विकासाच्या उद्देशाने ही प्रथा साजरी केली जाते.

गावातील सोमजाई माता देवस्थाना मध्ये नुकताच हा उत्सव साजरा करण्यात आला. गावातील सर्व वयाच्या लोकांनी एकत्र येऊन हा उत्सव मोठ्या उत्साहाने आणि आनंदाने साजरा केला. गावातील ठाणे, पुणे आणि मुंबई परिसरात राहणारे रहिवासी देखील उत्सवाच्या तयारीत सक्रियपणे सहभागी होतात आणि उत्सव यशस्वीपणे पार पडण्यासाठी आवश्यक सहकार्य देतात.

वर्षभरातील हा विशेष दिवस गावातील सर्वांसाठी अत्यंत महत्त्वपूर्ण ठरतो, कारण तो केवळ धार्मिक उत्सवच नाही, तर एकता आणि सहकार्याची भावना सुद्धा निर्माण करतो. *एक गाव, एक उत्सव* या परंपरेतून भौर्जे गावाने आपला सामाजिक आणि सांस्कृतिक ठसा मांडला आहे.

## शिरूर पोलिसांची धडक कारवाई

# स्कॉर्पिओ वाहनात ५३ किलो गांजा जप्त



**शिरूर । रमेश बनसोडे**

शिक्रापूर पोलिसांनी एक मोठी कारवाई केली असून, आलिशान स्कॉर्पिओ वाहनातून ५३ किलो गांजा हस्तगत केला आहे. पुणे जिल्ह्यातील शिरूर तालुक्यात गांजा तस्करी करणाऱ्या दोन स्कॉर्पिओंना पोलिसांनी जप्त केले आणि या तस्करीप्रकरणी सहा जणांना ताब्यात घेतले.


गुप्त माहितीच्या आधारे पुणे नगर मार्गावर गांजा तस्करी केली जात असल्याची माहिती ट्रॅफिक पोलिसांनी मिळवली. त्यानंतर, पोलीस निरीक्षक दिपरतन गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली सापळा रचला गेला. या कारवाईत दोन स्कॉर्पिओ आढळून आल्या, आणि त्यात गांजा सापडला.पोलिसांनी गांजा वाहतूक करणाऱ्या सहा जणांना ताब्यात घेतले असून, पुढील तपास सुरू आहे. शिक्रापूर पोलिसांच्या या यशस्वी कारवाईमुळे गांजा तस्करीला थोडा चाप लागण्याची शक्यता आहे.

# कारच्या धडकेत एक ठार,एक गंभीर जखमी

**तळेगाव । प्रतिनिधी**

सारवाडी येथील बाजार आटोपून स्वगावी पार्टीकडे दुचाकीने जात असताना भरधाव कारने जबर धडक दिल्याने एका व्यक्तीचा मृत्यू तर दुसरा गंभीर जखमी झाला आहे. हा अपघात शुक्रवार, ३१ जानेवारी रोजी पार्टी फाट्यावर घडला.या अपघातात आकाश टिपले (पार्टी) यांचा मृत्यू झाला असून दशरथ पेंदाम गंभीर जखमी झाले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, आकाश टिपले व दशरथ पेंदाम हे एम. एच. ३२ ए. जी. ८१४५ क्रमांकाच्या दुचाकीने सारवाडी येथे बाजारासाठी आले होते. बाजार आटोपून ते परत जात असताना अमरावतीवरून नागपूरच्या दिशेने भरधाव वेगाने येणाऱ्या एम. एच. ३० बी. डब्ल्यू. २०५८ क्रमांकाच्या कारने त्यांना जोरदार धडक दिली.



या धडकेत दोघेही गंभीर जखमी झाले. त्यांना तातडीने कारंजा येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, उपचारादरम्यान आकाश टिपले यांचा मृत्यू झाला. दशरथ पेंदाम यांची प्रकृती चिंताजनक असल्याने त्यांना नागपूर येथे हलविण्यात आले आहे.अपघात इतका भीषण होता की कार रस्त्याच्या कडेला जाऊन पलटी झाली. सुदैवाने कारमधील कोणतीही व्यक्ती जखमी झाली नाही. घटनेची माहिती मिळताच तळेगाव पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला व कार चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.पुढील तपास तळेगाव पोलीस करीत आहेत.

# शेतकऱ्यांचे प्रश्न प्राधान्याने सोडवा पालकमंत्री डॉ.भोयर यांचे आवाहन

**वर्धा । प्रतिनिधी**

शेतकऱ्यांच्या समस्या प्राधान्याने सोडवण्याचे निर्देश राज्याचे गृह (ग्रामीण), शालेय शिक्षण, सहकार, गृहनिर्माण, खनिकर्म विभागाचे राज्यमंत्री तथा पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी कृषी विभागाला दिले. जिल्हा क्रीडा संकुल, वर्धा येथे आयोजित जिल्हास्तरीय कृषी विभागाच्या क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

पालकमंत्री डॉ. भोयर म्हणाले की, भारत हा कृषिप्रधान देश असून शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे आहे. शेतकऱ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचा लाभ शेवटच्या टप्प्यातील शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवणे ही कृषी विभागाची महत्त्वपूर्ण जबाबदारी आहे. त्यामुळे कार्यालयात येणाऱ्या प्रत्येक शेतकऱ्याचे प्रश्न प्राधान्याने मार्गी लावावेत, असे त्यांनी सांगितले.क्रीडा स्पर्धांच्या आयोजनाविषयी बोलताना डॉ. भोयर म्हणाले की, वर्षभर कामाच्या व्यापामुळे अधिकारी-कर्मचाऱ्यांना स्वतःसाठी वेळ मिळत नाही. त्यामुळे अशा स्पर्धांमुळे सहकार्यांशी संवाद साधण्याची आणि कामकाजातील अडचणींवर चर्चा करण्याची संधी मिळते. आत्महत्याग्रस्त जिल्हा म्हणून लागलेला डाग पुसण्यासाठी सर्वांनी एकत्रित प्रयत्न करण्याचे आवाहन त्यांनी केले.जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शंकर तोटावार यांनी कृषी विभागावर १०० पेक्षा अधिक योजना राबविण्याची जबाबदारी असल्याचे सांगून कार्यालयात येणाऱ्या प्रत्येक शेतकऱ्याला न्याय देण्यासाठी अधिकारी-कर्मचाऱ्यांनी कटाक्षाने प्रयत्न करावेत, असे आवाहन केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी दीप प्रज्वलन करून क्रीडा स्पर्धांचे उद्घाटन करण्यात आले. कृषी विभागाच्या कर्मचाऱ्यांनी विविध पोशाख परिधान करून राज्याच्या संस्कृतीचे प्रदर्शन पथसंचलनाद्वारे केले. कार्यक्रमाचे संचालन पंकज सावरकर व मोईन शेख यांनी केले तर उपस्थितांचे आभार जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शंकर तोटावार यांनी मानले.




# दहीहंडी काला व महाप्रसादाच्या कार्यक्रमासाठी भाविकांची मोठी गर्दी

**सेलू । प्रतिनिधी**

सेलू - विदर्भाची प्रसिद्ध तीर्थक्षेत्र असलेल्या श्रीक्षेत्र घोराड येथे संत केजाजी महाराजांच्या ११८ व्या पुण्यतिथी उत्सवानिमित्त दुसऱ्या दिवशी दहीहंडी काला आणि महाप्रसादाचे कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडले. २२ जानेवारीपासून सुरू झालेल्या या उत्सवाची सांगता शुकरवारी दहीहंडी काला व महाप्रसादाच्या कार्यक्रमांनी झाली, ज्यामध्ये ३६,००० हून अधिक भाविकांनी पंक्तीच्या माध्यमातून महाप्रसादाचा लाभ घेतला.गुरुवारच्या दिंडी पालखी सोहळ्यानंतर शुकवारी सकाळी अकरा वाजता विहार रुक्मिणी मंदिरात हभप डॉ. आवारी महाराज वणी यांचे गोपालकाल्याचे किर्तन झाले. त्यानंतर, भजनी मंडळीसह हरिनामाचा जयघोष करत पालखी मंदिरास प्रदक्षिणा घालत गोमाता मंदिरावर गेली. त्यानंतर दहीहंडीचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. या कार्यक्रमासाठी गोमाता मंदिर परिसरात भाविकांची मोठी गर्दी उसळली.

बोरनदीवरील पालखी घाट फुलांची सजावट करण्यात आली होती. तिथे बोरगंगेच्या तीरावर पालखी गेल्यावर गंगेचे पूजन करण्यात आले, आणि पालखी मुख्य मंदिराजवळ पोहोचताच हरिपाठ मंडळाने केजाजी महाराजांच्या नावाचा जयघोष केला. यावेळी वातावरण भक्तिमय झाले आणि या सोहळ्याला पाहण्यासाठी मंदिर परिसरात भाविकांची मोठी गर्दी जमली होती.पालखी मंदिरात पोहोचल्यावर आरती करण्यात आली आणि त्यानंतर सर्व भाविकांना पंक्तीच्या माध्यमातून महाप्रसादाचे वितरण करण्यात आले. जवळपास ३६,००० ते ४०,००० भाविकांनी या महाप्रसादाचा लाभ घेतला.

